चंद्रपूर जिल्ह्यातील वार्षिक सरासरी पर्जन्यमानात होणारा बदल

प्रा. कमल एन. हिरादेवे, डॉ. एच. डी. लांजेवार

सारांश :-

पाणी सजिवांची मूलभूत गरज आहे. पाणी हे सजिवांच्या सर्वच अंगांना प्रभावित करते, सजिवांचे अस्तित्व पाण्याशिवाय टिकू शकत नाही. वसूंधरेची कल्पना आपण पाण्याशिवाय करुच शकत नाही, इतका पाणी हा महत्त्वाचा विषय आहे. पृथ्वीवरील जीवनदायी पाणीपूरवठा योजना म्हणजेच जलचक्र होय. पर्जन्याच्या माध्यमातून पृथ्वीवर येणाऱ्या पाण्याचे चलनवलन सातत्याने चालू असते. सूर्याच्या उष्णतेमूळे तापमानात चढ-उतार होतात व त्याजोगे पाण्याची वाफ होते वाफेच्या रुपातील पाणी पर्जन्याच्या माध्यमातून पुन्हा पृथ्वीवर येते व गुरुत्वाकर्षणामुळे हे पाणी सखलभागाकडे वाहू लागते यापैकी काही पाणी जमिनीत मूरते, काही पाणी खाच-खळगे धरण, बंधारे यामध्ये साठून राहते तर काही पाण्याचा उपयोग वनस्पती स्वतःसाठी करतात. जमिनीत मूरलेले पाणी केशाकर्षणामूळे पुन्हा जमिनीच्या पृष्ठभागाकडे येते तर झाडांनी स्वतःसाठी घेतलेले पाणी पर्णोत्सर्जनाच्या माध्यमातून पुन्हा वातावरणात सोडले जाते. अशा प्रकारे पाण्याचे चलनवलन सतत सूरु असते.

बिजसंज्ञा :- *सरासरी पर्जन्यमान, पर्जन्याची विचलनशिलता, पर्जन्याचे दिवस.*

व्याख्या :- सरासरी पर्जन्यमान -'हवामान विभागाने निर्धारीत केलेली पर्जन्याची मात्रा म्हणजे सरासरी पर्जन्यमान होय'.

पर्जन्याची विचलनशिलता -'सरासरी पर्जन्यमान व प्रत्यक्ष पडलेले पर्जन्य यातील तफावत म्हणजे पर्जन्याची विचलनशिलता होय'.

प्रस्तावना :-

ज्याप्रमाणे मानवी शरीरात लहान मोठ्या धमन्यातून रक्त प्रहावित होत असते. त्याचप्रमाणे पृथ्वीवर लहानमोठ्या जलप्रवाहा मार्गत जल प्रवाहित होत असते.

जगातील पाण्याच्या प्रत्येक थेंब पृथ्वीच्या जलचक्रामध्ये कुलुपबंद झालेला असतो. पावसाच्या पाण्याचा काही भाग प्रवाहामार्फत नदी, नाले व सरोवरात साचला जातो आणि त्यानंतर समुद्र तथा महासागरांना जाऊन मिळतो तर उरलेला पाण्याचा भाग जमिनीतील माती शोषून घेते. जमिनीतीलमातीने शोषलेल्या पाण्याला ग्राऊंड वॉटर म्हणतात. त्यामूळे झाडातील मूळ ग्राऊंड वॉटर चे शोषण करतात, त्यामूळे झाडाची वाढ होते. पावसाळा ऋतू हा जून ते सप्तेंबर याच महिन्यात असतो परंतु तो सगळीकडे सारखा पडत नाही पाऊस कुठे कमी तर कुठे जास्त पडतो कधी गरज असताना पडतो कधी गरज नसताना पडतो. मानवीय कृत्य जसे कि जंगल कटाई, जमीन लागवडीची जागा बदलणे, अणूबॉम्ब चाचणी, गृहबांधणी, पाटबंधारे निर्मिती आणि सांडपाणी विल्हेवाट लावण्याविषयीची अव्यवस्था इ. गोष्टींचा परिणाम जलचक्र बदलविण्यात होतो तसेच त्याचा परिणाम उपलब्ध असते ते पाणी दुषित करण्यात सुध्दा होतो.

अभ्यासक्षेत्र :-

चंद्रपूर जिल्हा हे अभ्यासक्षेत्र महाराष्ट्र राज्यात असून जिल्हाचा अंक्षाशीय विस्तार १६° ४० मिनिटे उत्तर ते २०° १० मिनिटे उत्तर अक्षवृत्त आहे. रेखांशीय विस्तार ७२° ६० मिनिटे उत्तर ते ८८° ९० मिनिटे पूर्व रेखावृत्त असा आहे, जिल्हाचे भौगोलिक क्षेत्रफळ ११४४३ चौ. किमी आहे. एकूण पंधरा तालूक्यांचा समावेश या जिल्हात झालेला आहे प्रामुख्याने नैऋत्य मौसमी वाऱ्यापासून या जिल्हात पाऊस पडतो जिल्हाचे सरासरी पर्जन्यमान १४२० मी. मी. एवढे आहे.

उद्दीष्ट्ये :-

१) पर्जन्य वितरणाचे तालुकानिहाय प्रारुप स्पष्ट करणे.

२) पर्जन्य दिवसाची तुलना करणे.

३) वार्षिक सरासरी पर्जन्यमानात होणाऱ्या बदलाची कारणे स्पष्ट करणे.

परिकल्पना :-

चंद्रपूर जिल्हातील वार्षिक सरासरी पर्जन्यमानात बदल होत आहे कारण निसर्गचक्रात बदल तसेच पर्यावरणात वाढता मानवी हस्तक्षेप.

अभ्यासपध्दती :-

प्रस्तूत शोध निबंध हा प्रामुख्याने दुय्यमआकडेवारी आधारीत आहे. यासाठी वेगवेगळ्या अभ्यासकांची पुस्तके, मासिके, तसेच इंटरनेटवरील माहिती व आकडेवारीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच चंद्रपूर जिल्हातील कृषी विभागाने प्रकाशित केलेल्या पर्जन्य आकडेवारीचे विश्लेषण योग्य सांख्यिकीय पध्दतीचा व नकाशांचा वापर करुन करण्यात आलेला आहे.

तथ्य संकलन व विश्लेषण

चंद्रपूर जिल्हातील हवामानाचे वैशिष्ट्या म्हणजे उष्ण उन्हाळा, नैऋत्य मौसमी वारे जिल्हात आगमन करे पर्यंत जिल्हाचे संपूर्ण तापमान सामान्य असते. नैऋत्य मौसमी वारे जिल्हात जून ते सप्तेंबर महिन्यात आगमन करतात. वर्ष १९०१–१९९२ पर्यंत जिल्हातील पर्जन्याचे प्रमाण हे सामान्य म्हणजे १२०० ते १४५० मी.मी. नोंद होती, परंतु वाढते नागरीकरण, कारखानदारी, बदलते हवामान, पर्जन्याचा दिवसात घट या काणांमूळे चंद्रपूर जिल्हातील पर्जन्याच्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो.

सरासरी पर्जन्यमान व्दिवार्षीक फरकाने व पर्जन्य विचलनशिलता

(मी.मी.)

तक्ता क्रमांक १.

तालूका	२००३	२००५	२००७	२००९	२०११	पर्जन्यातील घट/वाढ
चंद्रपूर	१२६७	१५४५	१५९६	५७२	१२३०	–३७
मूल	९००	१३६९	१४००	७०४	८५०	–५०
गोंडपिपरी	११३६	१२५६	१४५३	६७०	९८४	–१५२
वरोरा	११३५	१५९१	१३२३	५७२	८८५	–२५०
ब्रम्हपूरी	१०८६	१५२५	२०६२	९४३	१०८४	–२
नागभीड	१०९७	१५२४	१४०६	१३८५	९८२	–११५
राजूरा	११८०	१३६५	१३१३	५४९	८१०	–३७०
कोरपना	१७५२	१२५५	९१९	५४८	९०३	–८४९
ब्रम्हपूरी	११२४	१५१३	१९५९	५१३	८९७	–२२७
पोंभूर्णा	११७२	१३२७	१३९७	६२०	९४९	–२२३
भद्रावती	१०७२	१७०६	१२९१	५३६	११६५	+९३
चिमूर	७६४	१३३५	९८८	४७५	११८०	+४१६
सिंदेवाही	१०५२	१४४६	१५८७	९०८	११७४	+१२२
सावली	९०९	१६३३	१५२०	७६३	११२१	+२१२
एकूण	१११७.५७	१४५६.४२	१४४३.८५	६९७	१०१५.२८	१०२.२८

source :- www.agrimah.nic.in)

वरील सारणीवरून हे स्पष्ट होते कि २००३ च्या तुलनेत २००५ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वच तहसील मध्ये पर्जन्यात वाढझालेली आहे. तर २००५ च्या तुलनेत २००६ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील एकुण सर्वच तहसील मध्ये पर्जन्यात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे.

२०११ मध्ये सर्वात जास्त वाढचिमूर तहसीलमध्ये तर सर्वात कमी वाढ ब्रम्हपूरी तहसीलमध्ये दिसून येत आहे. एकूणच २००३ ते २०११ वर्षातील पर्जन्याचा आढावा घेतल्यास सर्वात कमी घट ब्रम्हपूरी तालुक्यात -२ त्यानंतर चद्रपूर तहसिल -३७ घट दिसून येत आहे तर सगळ्यात जास्त घट कोरपना -८४६ ने त्यानंतर राजूरा तहसिलमध्ये -३७० दिसून येत आहे. तर पर्जन्यमानातील वाढ चिमूर तालुक्यात +४१६ ने तर सावली तालुक्यात +२१२ दिसून येत आहे.

आलेख चंद्रपूर जिल्ह्यातील पर्जन्य विचलनशिलता दर्शक आलेख

आलेख क्रमांक १



वरील आलेखावरून चंद्रपूर जिल्ह्यातील २००३ ते २०११ वर्शातील पर्जन्यातील चढ उतार दिसून येते आहे.

पर्जन्यमान बदल होण्याची कारणे :-

चंद्रपूर जिल्हातील वार्शिक सरासरी पर्जन्यात बदल होण्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

मानवनिर्मित कारणे :-

१) पाण्याचा घरगुती अती वापर.
२) कृषीसाठी पाण्याचा अनियंत्रीत वापर.
३) वेगवेगळ्या उद्योगधंद्यात पाण्याचा अतिरिक्त वापर.
४) सरकारी नळाची नादुरूस्ती.
५) टाकावू पदार्थाच्या व्यवस्थापनाचा अभाव.
६) प्राणी व वनस्पतीचे पोषण व संवर्धन.
७) औष्णिक विद्युत निर्मिती .
८) लोकसंख्या वाढ
९) करमणूक
१०) वृक्षतोड
११) कॉंक्रीटिकरण
१२) जलजागृतीचा अभाव.
१३) शेतीत रासायनिक खतांचा अतिवापर.
१४) जलव्यवस्थानाचा अभाव.
१५) पावसाच्या पाण्याचे नियोजनाचा अभाव.
१६) खाणकाम क्षेत्रात होणारी वाढ.
१७) नागरी विकास.
१८) भुगर्भातील पाण्याचा उपसात वाढ.
१९) पाण्याच्या पातळीतील घट.

पर्यावरणीय कारणे

१) जागतिक उष्णता वाढ.
२) बाष्पीभवनाचा वेग जास्त.
३) पावसाच्या दिवसात घट.
४) भूपृष्ठाची जलग्रहणक्षमतेत घट.

वरील सर्व कारणावरून असे लक्षात येते कि पर्जन्याच्या प्रमाणात घट होण्यात मानवाचा सहभाग फार मोठा आहे मानवाने जाणीवपूर्वक या संपूर्ण कारणांकडे दुर्लक्ष केले असे दिसून येत आहे हे जर असेच होत राहिले तर भविष्यात पाण्यासाठी मोठे संकट मानवापूढे आवासून उभे राहणार आहे त्यासाठी मानवाने वेळीच जागे होणे आवश्यक आहे. तरच पाण्यासाठी निर्माण होणारा प्रश्न सुटेल.

निष्कर्ष :-

१) वृक्ष लागवड करणे.
२) पाण्याचा अपव्यय टाळणे.
३) जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे.
४) पावसाच्या पाण्याचे पूर्नभरण व पुर्नवापर करणे.
५) जलजागृती करणे.
६) नैसर्गिक संसाधनाचा विवेकपूर्व वापर करणे.
७) शेतीत सेंद्रीय खताचा वापर करणे.
८) अवास्तव कॉंक्रिटीकरणावर नियंत्रण करणे.
९) नगर विकासात पाण्यात व्यवस्थापनाकडे काटेकोर लक्ष देणे.

१०) पिक पध्दती भोगोलिक स्थिती नूसार निश्चित करणे.

११) लोक सहभागातून भुजल व्यवस्थापन करणे.

थोडक्यात पाणीप्रश्न सोडवायचा असेल तर केवळ चर्चा करून चालणार नाही तर नियम, कायदे करणे गरजेचे आहे तसेच वेळ प्रसंगी शिक्षा व बक्षिस यांचाही अवलंब केल्यास पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल

संदर्भ ग्रंथ

1 Gazetter of Chandrapur.
२) के. सागर –महाराष्टातील जिल्हे.
३) कराड डॉ. सायंस, प्रा.शशीकांत लहाने –चंद्रपूर जिल्हा.
४) चंद्रपूर जिल्हा कृषी विभाग.
५) चंद्रपूर जिल्हा जलसंपदा विभाग.
६) पर्यावरण भुगौलशास्त्र.
७) पर्यावरण शिक्षण.
८) दैनिक वृत पत्र.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

भारतातील मानव विकास - एक अभ्यास

प्रा.डॉ.बी.जी.खटाळ
दयानंद वाणिज्य महाविद्यालय,लातूर

प्रस्तावना :-

आर्थिक विकासाठी मानवी संसाधनांना अनन्यसाधारण असे महत्वाचे स्थान आहे. कारण की मानवी विकासावरच आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान होत असते. म्हणून सरासरी आयुर्मान, प्रौढ साक्षरता दर, बालमृत्यू दर, दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन, लोकसंख्या, इत्यादीना महत्वाचे स्थान असते. 1965 मध्ये UNDP –(संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम) स्थापन करण्यात आले. जगातील विकसनशील आणि अविकसित देषांसोबत काम करून आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवरील विकासाच्या समस्या सोडविणे आणि त्याव्दारे राहणीमानाचा स्तर उंचावणे असे महत्वाचे काम UNDP करते. याच प्रमाणे मानवी विकासाचे मोजमाप करण्यासाठी UNDP हे मानवी विकास निर्देशांक अहवाल प्रसिध्द करते. मानव विकास निर्देशांक ही तशी फार प्राचीन संकल्पना आहे. ॲरिस्टाटल यांनी आपल्या लिखाणामध्ये सुध्दा मानवी विकासाला महत्वाचे स्थान दिले होते.

यु.एन.डी.पी. ने 1990 मध्ये पहिल्यांदा मानव विकास अहवाल जाहीर केला. त्यामध्ये विविध देषांचे मानव विकास निर्देशांक मोजण्यात आले होते. त्यामागील प्रेरणा अर्थतज्ञ महबूब-उल-हक आणि अमर्त्यसेन यांची होती. महबूब-उल-हक यांना मानव विकास निर्देशांकाचे जनक म्हणून संबोधले जाते.

ग्रहितके :-

१) लोकसंख्या नियंत्रणास साहाय्य प्राप्त होते.

२) मानवी विकासाला एक साध्य म्हणून महत्व प्राप्त झाले आहे.

३) स्वस्थ समाजाची उभारणी करता येते.

४) आरोग्य,पोषण, शिक्षण यात सुधारणा होवून लोकांच्या कार्यक्षमतेत वाढ होते.

५) देशाच्या साधनसंपत्तीचा महत्तम वापर होतो.

मानव विकास निर्देशांकाचे निकष :-

१) आरोग्य :- देशाचा आरोग्याचा स्तर मोजण्यासाठी जन्माच्या वेळेचे आयुर्मान ही निर्देशक वापरला जातो.

२) शिक्षण :- देशाच्या शैक्षणिक स्तर मोजण्यासाठी खालील दोन निर्देशक वापरले जातात.

अ) 25 वर्ष पेक्षा अधिक वयाच्या प्रौढांची सरासरी शालेय वर्ष.

ब) 18 वर्षा पेक्षा कमी वयाच्या मुलांची अपेक्षित शालेय वर्ष.

शिक्षणाचा निर्देशांक या दोन्ही निर्देशकांचा भूमितीय मध्ये असतो.

जीवनमानाचा दर्जा :- देशाच्या जीवनमानाचा दर्जा माजण्यासाठी दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हा निर्देशक वापरला जातो.

मानव विकास निर्देशांक अहवाल -2018

संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्य असलेल्या जगातील 189 देषासाठी UNDP ने HDI अहवाल -2018 मध्ये प्रसिध्द केला आहे. 2017 साठी नॉर्वे, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया, आर्यलंड आणि जर्मनी यांचा HDI अनुक्रमे सर्वाधिक असून नायजर, मध्ये आफ्रिकन

प्रजासत्ताक, दक्षिण सुदान, चाड आणि बुरुंडि यांचा HDI सर्वात कमी आहे.

भारताचे स्थान :-

2017 मध्ये 189 देषांच्या यादीत भारताचे स्थान हे 130 व्या क्रमांकावर आहे. मागील वर्षाची तुलना करता भारताचे स्थान एका क्रमांकाने उंचावले आहे. म्हणजेच भारताने मानव विकासात प्रगती केल्याचे दिसून येते. मागील काही वर्षात भारताने राबविलेल्या षिक्षण आरोग्यासंबंधित योजनांमुळे सुधारणा झाली आहे.

1990 ते 2017 पर्यंतचा भारताचा प्रवास :-

1990 ते 2017 या दरम्यान भारताच्या मानव विकास निर्देशांकात 50 % नी वाढ झाली आहे. 1990 साली भारताचा HDI 0.427 होता त्यात वाढ होत जावून तो 2017 मध्ये 0.640 झाली यामुळे भारताचा समावेष मध्यम मानव विकास गटात झाला आहे. त्याच बरोबर 1990 च्या तुलनेत भारतीय नागरीकांचे सरासरी आयुष्यमान 11 वर्षानी वाढले आहे. शिक्षणाच्या कालावधीत 1990 पेक्षा 2017 मध्ये 4.7 वर्षाची वाढ झाली आहे. 1990 मधील प्रतिव्यक्ती स्थूल राष्ट्रीय उत्पनात 2017 पर्यंत तब्बल 266.6% वाढ झाली आहे. भारताने या घटकात प्रगती केल्यामुळे भारताच्या HDI मध्ये सकारात्मक वाढ झाल्याचे दिसून येते.

SINCE 1990, THE STEADY CLIMB

	Life expectancy at birth	Expected years of schooling	Mean years of schooling	GNI per capita (2011)*	HDI value
1990	57.9	7.6	3.0	1733	0.427
1995	60.4	8.2	3.5	2015	0.46
2000	62.6	8.3	4.4	2470	0.493
2005	64.6	9.7	4.8	3157	0.535
2010	66.6	10.8	5.4	4357	0.581
2015	68.3	12.0	6.3	5691	0.627
2016	68.6	12.3	6.4	6026	0.636
2017	68.8	12.3	6.4	6353	0.64

Rank		Country/Territory	HDI	
2018 rankings [1]	Change in rank from previous year[1]		2018 rankings [1]	Change from previous year [1]
1	—	Norway	0.953	▲ 0.002
2	—	Switzerland	0.944	▲ 0.001
3	—	Australia	0.939	▲ 0.001
4	—	Ireland	0.938	▲ 0.004
5	▼ (1)	Germany	0.936	▲ 0.002
6	—	Iceland	0.935	▲ 0.002
7	▲ (1)	Hong Kong	0.933	▲ 0.003
7	—	Sweden	0.933	▲ 0.001
9	▼ (1)	Singapore	0.932	▲ 0.002
10	—	Netherlands	0.931	▲ 0.003
11	▼ (1)	Denmark	0.929	▲ 0.001
12	—	Canada	0.926	▲ 0.004

13	▼ (1)	United States	0.924	▲ 0.002
14	—	United Kingdom	0.922	▲ 0.002
15	—	Finland	0.920	▲ 0.002
16	—	New Zealand	0.917	▲ 0.002
17	▼ (1)	Belgium	0.916	▲ 0.001
17	▼ (1)	Liechtenstein	0.916	▲ 0.001
19	—	Japan	0.909	▲ 0.002
20	—	Austria	0.908	▲ 0.002
21	—	Luxembourg	0.904	▲ 0.001
22	—	Israel	0.903	▲ 0.001
22	▲ (1)	South Korea	0.903	▲ 0.003
24	—	France	0.901	▲ 0.002
25	—	Slovenia	0.896	▲ 0.002
26	—	Spain	0.891	▲ 0.002
27	—	Czech Republic	0.888	▲ 0.003
28	—	Italy	0.880	▲ 0.002
29	—	Malta	0.878	▲ 0.003
30	—	Estonia	0.871	▲ 0.003

Source: UNDP HDI report 2018 ranking

मानव विकास निर्देषांकाच्या मर्यादा :-

१) अनेक घटकाकडे दुर्लक्ष :- मानव विकासाचे मापन करत असताना बालमृत्यू, सुरक्षितता, पोषण आहार, यां सारख्या अनेक घटकांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

२) अपरिपक्व निर्देषांक :- डॉ.अमर्त्य सेन यांच्या मते मानवी विकासातील गुंतागुंतीची वास्तवता एका साध्य आकडयाच्या साह्याने निष्चित करणे कठीण आहे. यामुळे मानवी विकास निर्देशांकावर अपरिपक्व निर्देशांक म्हणून मर्यादा पडते.

३) अनिश्चितता:- मानव विकास निर्देशांकात भारांकाचा वापर करण्याची निश्चित अशी पध्दत नाही यामुळे निर्देशांक परिपूर्ण बरोबर येत नाही.

४) आर्थिक विषमतेच्या समस्येकडे दुर्लक्ष:-मानवी विकास निर्देशांक देशातील आर्थिक विषमतेच्या समस्येकडे लक्ष केंद्रीत करत नाही यातून देषातील वाढती लोकसंख्या बेकारी दारीद्रय, प्रादेशीक असमतोल इत्यादी मुळे देशा समोरील समस्या जाणिवपूर्वक दुर्लक्षित राहतात.

मानवी विकास ही संकल्पना आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यापेक्षा आधिक व्यापक आहे. कारण की आर्थिक विकास व वृध्दी यामुळे मानवाच्या राहणीमानाचा स्तर उंचावून मानवी विकासाला चालना मिळते. लोकांना उपलब्ध असलेल्या विकल्पाची संख्या वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे मानव विकास होय. मानव विकास निर्देशांक हे आर्थिक विकासाचा एक महत्त्वपूर्ण मापक म्हणून मान्य झाला आहे.

संदर्भ ग्रंथ :-

1) Indian Economy - Datt – Sudharma

2) Indian Economy- Misra- Puri
३) भारतीय अर्थशास्त्र- डॉ.जी.एन.झामरे
४) भारतीय अर्थव्यवस्था -प्रतियोगिता दर्पन-2017—18
५) भारतातील आर्थिक विकास आणि नियोजन -डॉ.बी.जी.खटाळ

डॉ. नानासाहेब जाधव यांची शैक्षणिक क्षेत्रातील भूमिका

प्रमोद विक्रम राठोड
संशोधन केंद्र :- जवाहरलाल नेहरू समाज कार्य महा.
नवीन नादेड ४३१६०५

प्रस्तावना :- (Introduction)

व्यक्तीची ओळख त्याच्या कार्याने होते. असे समजले जाते आणि हे कार्य स्वतःसाठी नसून दूसऱ्यासाठी केले जाते. अथवा समर्पित केले जाते. तेंव्हा अशी व्यक्ती साधारण नसते. अशाच एका असाधारण व्यक्तीचे नाव डॉ. नानासाहेब जाधव यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले शिक्षणाच्या नावावर, त्यांनी शिक्षणाच्या सहाय्याने नव्याने उभे रहात असलेल्या घरा-घरामध्ये शिक्षणाची ज्योत पोहचवली आणि समाजातील दीन-दुबळया समाजाला सन्मानाने व स्वाभिमानाने जीवन जगण्यास प्रेरित केले. महाराष्ट्रात मराठवाडयात शिक्षण देणारे तसेच शैक्षणिक संस्था चालविण्याचे कार्य करणारे संस्थाचालक बोटावर मोजण्या इतकी आहेत. त्यामध्ये डॉ. नानासाहेब जाधव यांचे नाव आहे. श्री. सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ नांदेड ही संस्था समाजातील सर्व सामान्यासाठी शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रामध्ये गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत आहे. आज जवळ जवळ ४१ शाखा या संस्थेचे कार्यरत असल्याचे दिसून येते. प्रत्येक शाखेवर डॉ. नानासाहेब जाधव स्वतः जातीने लक्ष देऊन विकास हा दृष्टीकोन समोर ठेवून त्यांनी प्रत्येक युनिटची प्रगती साधली आहे. केवळ शाळा, महाविद्यालयच नव्हे तर समाजातील गोर-गरिब विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह, तसेच अंपग मुलांचे वस्तीगृह, अनाथ मुलांसाठी अनाथालय इत्यादी शाखा आज चालवितांना दिसून येतात.

डॉ. नानासाहेब जाधव यांच्या संदर्भात नांदेड विधान परिषदेचे सदस्य अमर राजूरकर यांनी मांडलेले मत, "आजपासून ५० वर्षापूर्वी शिक्षणाची गंगा बहूजन समाजापर्यंत नेण्याची शैक्षणिक चळवळ कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव यांनी उभी केली, टिकवली आणि वाढवली देखील, ज्यामुळे श्री. सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या मार्फत ५ दशकापूर्वीपासून यशस्वी शैक्षणिक चळवळ उभी राहू शकली."[१] महाराष्ट्रात मराठवाडयात दीन-दलितांच्या शैक्षणिक विकासासाठी महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या डॉ. नानासाहेब जाधव साहेबांनी अगदी विद्यार्थ्यांदशेपासून समाजाच्या बांधीलकीची जाण ठेवून विविध शैक्षणिक उपक्रमामध्ये जोमाने भाग घेत. समाजातील शैक्षणिक अडचणी राज्यकर्त्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी सनदशीर मार्गाने त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आणि त्यासाठी वेळोवेळी जन आंदोलनेही उभी केली. या जरनलच्या माध्यमातून त्यांची शैक्षणिक क्षेत्रातील भूमिकेची ओझरती ओळख करून देण्याचा हा एक प्रयत्न आहे.

जीवन परिचय :-

डॉ. नानासाहेब जाधव यांचा जन्म १ जानेवारी १९५६ रोजी दिग्रस खुर्द तांडा येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामकिशन गोविंद नाईक आणि आईचे नाव राजाबाई रामकिशन नाईक असे होते. त्या काळी बंजारा समाज उपेक्षितांचे आणि अस्पृश्यांचे जीवन जगत होता. शिक्षण सोडा, साधे माणसाचे जीवनही या समाजाच्या वाटयाला मिळत नव्हते. याच समाजाच्या नशीबी गुरे-ढोरे पाळणे त्यांना चारण्यासाठी गावोगावी माळरानी भटकंती करणे हेच होते. पण अशा प्रतिकूल परिस्थितीत नानासाहेबांना त्यांच्या वडिलाने शाळेत घातले. डॉ. नानासाहेब जाधव यांचे प्राथमिक शिक्षण पहिली व दूसरी एका खाजगी शिक्षकाद्वारे दिग्रस खुर्द या राहत्या तांडयातच झाले. इयत्ता तिसरीचे शिक्षण कोटग्याळ ता. मुखेड जि. नांदेड येथील श्री. किशनराव राठोड यांनी काढलेल्या प्राथमिक शाळेत झाले. १९५६ मध्ये श्री रामराव राठोड यांच्या संस्थेची प्राथमिक शाळा श्री नाईक विद्यामंदिर दिग्रस खुर्द येथे सुरू झाली. याच शाळेत सन १९६५ ला इयत्ता चौथी मध्ये डॉ. नानासाहेब जाधव यांनी प्रवेश घेतला. श्री नाईक विद्यामंदिराला पूढे माध्यमिक वर्ग जोडण्यात आले. सन १९६५ ते १९७२ या कालावधीतपर्यंतचे शिक्षण इयत्ता चौथी ते दहावी त्यांनी याच शाळेत पूर्ण केले.[२] सन १९७२ मध्ये पी.यु.सी (विज्ञान) यशवंत महाविद्यालय नांदेड येथे पूर्ण केले. सन १९७३ ला याच महाविद्यालयात बी. एससी. प्रथम वर्गात प्रवेश घेतला. डॉ. नानासाहेब जाधव यांना वैधकीय शिक्षण घेऊन डॉक्टर होण्याची इच्छा होती. याच काळामध्ये श्री नाईक विद्यालयाच्या असलेल्या जबाबदारीत वाढझाल्याने डॉ. नानासाहेब जाधव यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ लागले. पुढील काळात त्यांनी उदगीर येथील उदयगिरी महाविद्यालयामध्ये बी.ए. पदवीचे शिक्षण पूर्ण केले. नंतरच्या काळात जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय सिडको

नवीन नांदेड येथून एम.एस.डब्ल्यू. पदव्युत्तर कोर्स पूर्ण केला. पुढेयाच समाजकार्य महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून सन १९९५ पासून ते कार्यरत राहीले. पुढे या महाविद्यालयामध्ये प्रभारी प्रचार्य म्हणून जवळ जवळ १४ वर्षे ते काम पाहिले. एकंदर या सर्व कार्यामूळे ते पुढे संशोधनाकडे वळले. संस्थेचा प्रचंड व्याप असातानाही शेवटी इ.स. २०१२ मध्ये शिक्षणातील सर्वोच्च पदवी पी.एचडी. त्यांनी मिळविली. वैद्यकिय डॉक्टर होण्याची अपूर्ण राहिलेली इच्छा सामाजिक डॉक्टर होऊन पूर्ण केली. आज त्याच्या कार्यचे क्षेत्र वाढले असून ते 'श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेच्या संचालक पदावर कार्यरत आहेत.

शिक्षणातून शैक्षणिक संस्थाकडे वाटचाल :-

ग्रामीण भागातील गोर-गरीब मुलामुलींना शिक्षणाची सोय व्हावी, त्याचे भविष्य सुधारावे आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा ही उद्दिष्ठय डोळयासमोर ठेवून डॉ. नानासाहेब जाधव यांनी १९७० साली स्वतःच्या नेतृत्त्वाखाली गांधीनगर येथे 'श्री. सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ' या सेवाभावी शिक्षण संस्थेची स्थापना केली. आणि येथून त्यांच्या शैक्षणिक कार्याला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. दरम्यानच्या काळात कै. वसंतराव नाईक महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी होते आणि राज्यातील भटक्या विमुक्तांच्या मुलांमुलींना शिक्षण देण्यासाठी दुर्गम व ग्रामीण भागात आश्रमशाळा सुरू करण्याचा उपक्रम त्यांनी हाती घेतला होता. या उपक्रमाने डॉ. नानासाहेब जाधव भारावून गेले आणि त्यांनी आपल्या मुळगावी गांधीनगर येथे आश्रमशाळा सुरू करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केला. त्यांच्या या प्रस्तावास शासनाने १९७७ साली मान्यता दिली आणि याच वर्षी गांधीनगर या लहानशा गावात प्राथमिक आश्रमशाळा सुरू झाली.[३] इ.स.१९७७ साली लावलेले हे रोपटे आज वटवृक्षामध्ये विलीन झाले आहे. आज या संस्थेचे जवळ जवळ ४१ युनिट कार्यरत असून एवढया मोठया युनिटची जबाबदारी डॉ. नानासाहेब जाधव हे स्वतः पाहत असतांना दिसून येतात. या संस्थे अंतर्गत प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्चमाध्यमिक शाळा, अपंग शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, समाजकार्य महाविद्यालय, शा. शि. महाविद्यालय, निराधार मुलामुलींसाठी वसतिगृह तसेच माहिती व तंत्रज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली आहे.विशेषतः ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची सोय अपूरी आहे हे ओळखून त्यांनी ग्रामीण भागामध्ये आश्रमशाळा सुरू करून शिक्षणाची आवड व शिक्षण हे सर्व तळागाळातील लोकांना मिळाले पाहिजे ही तळमळ डॉ. नानासाहेब जाधव यांच्या जवळ असल्यामुळे त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे.

डॉ. नानासाहेब जाधव यांची शैक्षणिक क्षेत्रातील भूमिका :-

डॉ. नानासाहेब जाधव यांच्या एकंदरीत जीवन परिचयातून आणि शैक्षणिक संस्थेतील वाटचालीवरून त्यांचे व्यक्तीमत्त्व समजण्यास मदत होते. त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील भूमिका पुढील मुद्दाच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१) संस्था संचालक म्हणून भूमिका :-

डॉ. नानासाहेब जाधव यांनी स्थापन केलेली 'श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेचे ते संस्था संचालक म्हणून कार्य करताना प्रसंगी प्रखर बोलणारे परंतु थोडयाच वेळानंतर मायेची शाल पांघरून प्रेमळ वागणूक देऊन कर्मचाऱ्यांना पुन्हा कार्य करण्यास प्रेरित करतात. आपल्या संस्थेअंतर्गत चालणाऱ्या प्रत्येक युनिटवर डॉ. नानासाहेब जाधव यांचे बारकाईने लक्ष असते. अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यामध्ये विविध कला गुण विकसित व्हावे यासाठी विविध साहित्यीक, सांस्कृतिक व क्रिडाविषयक उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत त्यांचा नेहमी आग्रह असतो. असे उपक्रम राबविण्यासाठी अनेक वेळा ते स्वतः पुढाकार घेतांना दिसतात. शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यामध्ये स्वाभिमान व आत्मविश्वास जागृत झाला पाहिजे यासाठी ते सतत पुढाकार घेत असतात. त्याबरोबर संस्थेतील सर्वच शाखामधील सोई, सुविधावर त्याचे बारकाईने लक्ष असते. त्यामुळेच त्यांच्या संस्थेतील सर्व शाखांना भव्य व सुसज्ज इमारती आहेत. प्रत्येक शाखासाठी क्रिडांगणे, तज्ञ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग आहे. म्हणून आज ही संस्था नांदेड जिल्हात गुणवत्ता जोपासणारी संस्था म्हणून पुढे आली आहे. हे केवळ डॉ. नानासाहेब जाधव यांच्या भूमिकेमुळेच शक्य झाले.

२) विविध पदावरील शैक्षणिक भूमिका :-

डॉ. नानासाहेब जाधव हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व संपादीत केलेली व्यक्ती असे म्हटले तर अतिशोक्ती होणार नाही. त्यांच्या कार्यातून त्यांची शैक्षणिक क्षेत्रातील भूमिका स्पष्ट होतांना दिसून येते. ते एक संस्थासंचालक, अधिव्याख्याता, प्राचार्य, एक उत्तम प्रशासक, शैक्षणिक क्षेत्रात काम करित असताना आश्रमशाळा संचालक संघाचे सरचिटणीस, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य,१५ वर्षे, महाराष्ट्र राज्य सोशल वर्क्स मॅनेजमेंट ॲण्ड स्टाफ फोरमचे

सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य खाजगी शैक्षणिक संस्थाचालक संघाचे जनरल सेक्रटरी, महाराष्ट्र राज्य विमुक्त जाती व भटक्या संघाचे सरचिटणीस गांधीनगर ग्रामपंचायतीचे १५ वर्षे सरपंच, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नांदेड जिल्हा सरचिटणीस,[४] जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय नांदेड या कॉलेजचे प्राचार्य इत्यादी महत्वपूर्ण पदावर कार्य करित असताना डॉ. नानासाहेब जाधव यांनी अनेक शैक्षणिक दुष्टीकोनातून आपली भूमिका निभावलेली आहे.

३) शिक्षण श्रेत्रातील एक प्रभावी व्यक्तीमत्त्व :-

महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाडयातील शिक्षण क्षेत्रात कार्य कारणारे प्रभावी व्यक्तीमध्ये आदराणे डॉ. नानासाहेब जाधव यांचे नाव घेतले जाते. त्यांना तसे पाहता शैक्षणिक क्षेत्रातील वारसा नव्हता. परंतु स्वतःची प्रखड इच्छा शक्ती व काही तरी करण्याची जिद्द आणि अशा जिद्दीतून उदयाला आलेले एक प्रभावी शिक्षण क्षेत्रातील व्यक्तीमत्त्व म्हणजे डॉ. नानासाहेब जाधव होय. त्यांनी अगदी शिक्षण क्षेत्रातूनच आपल्या कार्याला सुरूवात केल्याचे दिसून येते. अफाड कष्ट, घेतलेले कार्य पुर्ण करण्याची तयारी, संस्थेतील कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय निर्माण करणे, शिक्षणातून समाजाचा विकास कसा साधता येतो. अशा अनेक प्रश्नाचे उत्तर त्याच्या व्यक्तीमत्त्वातून दिसून येते. त्यांनी केलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यामूळे ते अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहेत. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'दलित मित्र' संस्था पुरस्कार महाराष्ट्र राज्य मुंबई १९९५, 'भारत एक्सलेंन्स' पुरस्कार नवी दिल्ली १९९८, 'ग्लोरी ऑफ इंडिया' पुरस्कार नवी दिल्ली १९९८, 'विजय रत्न' पुरस्कार नवी दिल्ली १९९९, 'इंडिया गोल्डस्टार' पुरस्कार नवी दिल्ली १९९९, 'वेस्ट सिटीझन ऑफ इंडिया' पुरस्कार नवी दिल्ली १९९९, 'एकता गौरव' पुरस्कार २००४ भारतीय शिक्षा रत्न पुरस्कार नवी दिल्ली २००८, भारतीय विकास रत्न पुरस्कार नवी दिल्ली २००८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितमित्र पुरस्कार महाराष्ट्र राज्य मुंबई २०१०.[५] वरिल पुरस्काराची यादी पाहता डॉ. नानासाहेब जाधव यांचे शिक्षण क्षेत्रातील एक प्रभावी व्यक्तीमत्त्वातील भूमिका स्पष्ट होते.

मुल्यमापन :-

डॉ. नानासाहेब जाधव यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील भूमिका लक्षात घेत असतांना असे दिसून येते की, त्यांनी ग्रामीण जीवन जगण्याची पध्दत फारच जवळून अनुभवली होती. त्यामूळे त्यांनी सर्वप्रथम स्वतःला उच्चशिक्षीत केले आणि नंतर ग्रामीण भागातील तरूणाच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षणाची फार मोठी सोय उपलब्ध करून दिली. या भागातील शैक्षणिक क्षेत्रातील विकासाबदल नेहमीच त्यांची भूमिका सकारात्मक ठरली आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती इतक्या मोठया प्रमाणात शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची मशाल पेटवू शकते हे एक ज्वलंत उदाः आहे. असे म्हटल्यास अतिशोक्ती होणार नाही. तसे पाहता डॉ. नानासाहेब जाधव यांना शैक्षणिक कार्याचा वारसा लाभलेला होता असे नाही परंतु स्वतः जवळ असलेली प्रबळ इच्छा शक्ती, कुशल नेतृत्त्व, तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची प्रेरणा, आणि समाजाबदल असलेली आस्था इत्यादी गुणामूळे आज डॉ. नानासाहेब जाधव यांचे शैक्षणिक क्षेत्रातील भूमिका उमटून दिसत आहे.

संदर्भ ग्रंथ

१) देशोन्नती वुत्तपत्र २ जानेवारी २०१८ लेख.
२) 'कर्मयोगी' डॉ. नानासाहेब जाधव 'गौरव अंक' संपादक प्रा. श्रीनिवास जाधव २०१४ पेज नं. ११
३) 'ज्ञानदीप' वर्षिक अहवाल व वार्षिकांक २००६–०७ संपादक प्राचार्य एस.व्ही. घूले.
४) कित्ता, प्राचार्य मनोगत बाजूचे पेज.
५) 'कर्मयोगी' डॉ. नानासाहेब जाधव 'गौरव अंक' संपादक प्रा. श्रीनिवास जाधव २०१४ पेज नं. ८८.

आधुनिक द्रक-श्राव्य साधनातील संगणकाचा वर्गाअध्यापनात वापर

सहाय्यक.प्रा.राख चंद्रशेखर शेषराव
वसंतराव नाईक अध्यापक महाविदयालय,
शिरुर ताजबंद
ता. अहमदपूर, जि. लातूर

प्रस्तावना :-

एकेविसावा शतकात ज्ञानाचा प्रचंड विस्फोट झाला आणि संपूर्ण विश्वात एक क्रांती घडून आली. ही क्रांती तंत्रविज्ञान क्षेत्रातील क्रांती होय. या क्रांतीला महत्वाचा शोध हा संगणकाचा. संगणकाच्या काम करण्याच्या गतीमुळे सर्वच क्षेत्रात प्रगती झपाटयाने घडून आली व येत आहे. संगणकाचा वापर ही काळाची गरज आहे. प्रचंड प्रमाणात माहितीचा संग्रह करणे आणि त्यावर संस्करण करणे संगणकाच्या वैशिष्टयामुळे तो प्रत्येक क्षेत्रात वापरला जाऊ लागला. मोठ मोठे उदयोग, बँका, रेल्वे, कार्यालयीन कामकाजा शिवाय मानवी जीवनाशी निगडित असलेल्या प्रत्येक क्षेत्रात संगणकाचा वापर केला जातो. सध्याचे युग हे संगणकाचे युग म्हणावयास हरकत नाही. शिक्षण क्षेत्रात अर्थातच याचा वापर महत्वाचा ठरतो. आधुनिक दृक-श्राव्य साधनांच्या वापरामध्ये संगणक फार महत्वाचा आहे.

संगणकाची व्याख्या :- संगणक हे इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. त्याची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल. 'An electronic device having a capacity of storing and processing data as per given is known as computer' म्हणजे स्मृतिके सामविलेल्या माहितीचे दिलेल्या आज्ञावलीनुसार गणितातील कृती आणि तार्किक स्वरुपात वापरुन संस्करण करण्याची क्षमता असलेल्या इलेक्ट्रानिक उपकरणाय संगणक असे म्हणतात.

संगणकाव्दारे शिक्षण :- संगणकाच्या युगात व्यक्तीला संगणकाविषयी माहिती नसेल तर तो संगणक साक्षर नाही. म्हणून सध्या 'Computer Lteracy' ही संकल्पना समोर आली. कारण संगणकाचा वापर अध्यापनात महत्वाचा ठरला आहे. अध्यापन अनुदेशन या कार्यात संगणक विविध प्रकारे उपयोगी पडतो. त्याचा उपयोग अनुदेशकाने कसा करुन घ्यायचा हे त्याला ठरवावे लागेल. संगणकाचा उपयोग विविध स्तरावरील अध्यापना साठी प्रभावी पणे केला जाऊ शकतो. सामान्या विद्यार्थ्यापासुन ते प्रौढ व्यक्ती पर्यंत सर्वानाम संगणकाव्दारे शिक्षण देता येते. बालवाडी, नर्सरी, प्राथमिक शिक्षणापासूनच संगणकाचा उपयोग शाळात केला जातो. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत संगणक कक्ष आवश्यक झाले आहे. संगणकाचा सहाय्याने पुढील प्रमाणे शिक्षण देता येते.

संगणकाचा शिक्षण क्षेत्रात वापर (उपयोग)

संगणकाचे युग शाळामध्ये उजाडत आहे. ते जगाला जलद आणि खात्रीने ताबा घेत आहे. पाठयपुस्तकावर अवलंबुन असलेल्या पारंपारिक अध्यापनाकडून ते संगणकाच्या वापराकडे घेतलेली झेप आहे. संगणक दुहेरी हेतू साध्य करते. ते विदयार्थ्यावर नवीन वैज्ञानिक दृष्टीकोनाचे संस्कार करतानाच त्यांना आधुनिक तंत्रज्ञानही खुले करतात.

विद्यार्थी आणि शिक्षक आता आधुनिक शैक्षणिक साधन म्हणून कॉम्प्युटर असिस्टेड इन्स्ट्रकशन किंवा कॉम्प्युटर निमंत्रित इन्स्ट्रक्शन वापरत आहेत. त्याची वैशिष्टये

1. ती अतिशय आंतर क्रियात्मक आहे.
2. प्राप्त माहिती वेगवेगळया पध्दतीने सादर करता येते.
3. एखादया विशिष्ट समस्येकडे वेगवेगळया अंगानी पाहण्यासाठी त्याचे प्रोग्रामिंग करता येते.
4. माहितीवर स्थिर प्रझेंटेशनच्या पलीकडे जाते आणि ती व्हिडिओ डिस्पले युनिट आणि एलसीडीवरुन पडदयावर ही प्रदर्शित करता येते.

आणखीन दुसरी बाजू अशी की, संगणकाची शक्ती ही त्याच्या सॉफ्टवेअर मधून निर्माण झालेली असते. सॉफ्टवेअर म्हणजे प्रोग्रामचा संच असतो. उघडया डोळयांनी कोणीही त्याची शकतो पाहू शकत नाही. परंतु त्याच्या परिणामातून त्याचा प्रभाव अनुभवता येतो. स्व. राजीव गांधीनी उदघाटन केलेल्या 'क्लास' प्रकल्पाचे 1980 मध्ये स्मार्ट स्कूल सुरु करुन संगणकाचा शैक्षणिक साधन म्हणून वापर करण्याची नवी दृष्टी दिली आहे.

शिक्षक प्राध्यापक संगणकाचा साहाय्याने अध्ययन करण्याचे पॅकेज तयार करु शकतात. ज्याचा विद्यार्थी आपल्या सवडीने स्वत:हून शिकण्यासाठी वापर करु शकतात. संगणकाच्या मदतीने शिक्षक त्यांचे अध्यापन अधिक जिवंत वैविध्य पूर्ण आणि रोचक करु शकतात. शिक्षक आणि विद्यार्थीना अध्यापन - अध्यापनामध्ये भेडसावणा-या समस्यावर मात करायला मदत करु शकतात. हे नवे माध्यम बोलू शकते व आंतरक्रिमाही घडवते. संकल्पनाच्या स्पष्टीकरणासाठी सीडी, डीव्हीडी या स्वरुपात बाजारात उपलब्ध आहे.

संगणकाचे बहूमाध्यमे :-

बहूमाध्यम या संज्ञेचे स्पष्टीकरण अनेकांनी वेगवेगळया पध्दतीने केले आहे. यात ध्वनी, ग्राफीक्स, ॲनिमेशन आणि व्हिडीओ, या सारख्या कम्युनिकेशन घटकाच्या मिश्रणातून माहितीचे सादरीकरण असे या संकल्पनेचे पण वर्णन करता येईल. ही संज्ञा आता संगणकाच्या माध्यमातून आंतरक्रियात्मक दळणवळण (संप्रेषण) साधनाच्या सिस्टीम संदर्भात वापरली जाते. तो नवनिर्मिती करतो साठवतो, आणि प्रसारित करते. एखादा पाठयघटक ग्राफिक्सच्या आणि श्राव्य नेटवर्कचे रिट्राइव्ह करते.

अगदी अलीकडच्या काळात संगणकाच्या साहाय्याने , टेक्स्ट, ध्वनी, ग्राफीक्स, ॲनिमेशन आणि व्हिडीओ या सारख्या माहितीची भर घालून मल्टीमिडीयाची निर्मिती करण्याच्या प्रक्रियेची कार्यवाही करण्यात येवून आंतरक्रियात्मक संगणकीय मल्टिमिडीया प्रोग्राममध्ये कॉम्प्लेक्स ग्राफीक्स आणि ॲनिमेशन ॲडीओ, व्हिडीओ, प्रतिमा याच्या सयुंगातून शैक्षणिक विकासाचा हातभार लागतो.

संगणकातील आंतरक्रियात्मक बहुमाध्यमाचे फायदे :-

1. फ्लेग्झिबल लर्निमला मदत करते. कोर्सचा मार्ग, एन्ट्री करावयोच मुद्दे कोर्समधून बाहेर पडणे. ठिकाण आणि वेळ, विद्यार्थी शिक्षक आणि स्त्रोतामधील आंतरक्रियाचा फॉर्म, आणि पॅटर्न, अभ्यास आणि संप्रेषणास साहणभूत ठरणारे स्त्रोताचे प्रकार आणि वैविध्य, शिक्षण प्रक्रियेचे ध्येय आणि निष्कर्ष आणि संपादणूक आणि यशाचे मूल्यमापन करण्यासाठी वापरलेल्या पध्दती यातून लवचिकता ओळखली जाते.
2. माध्यमांचे आंतरक्रियात्मक स्वरुप विद्यार्थ्यांना तात्काळ आणि सर्वसमावेशक पुर्नभरण (फिडबॅक) देते
3. विद्यार्थ्यासाठी बहूमाध्यमाच्या माध्यमातून शिकणे ही क्रियाशिल व गुंतवून ठेवणारी प्रक्रिया आहे.
4. बहुमाध्यम प्रोग्राम आराखडा शिक्षण आणि पर्यावरण यांना एकत्र आणण्यासाठी तयार करावा.
5. मल्टीमिडीया, डेटाबेस, सीडी-रॉमच्या पॅकमध्ये उपलब्ध असलेल्या एनसायक्लोपीडीयाचे वर्णन करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.
6. ग्राफीक्स, ॲनिमेशन आणि ध्वनी ही मल्टीमिडीयाची कंपोनंटस, विज्युअलायझेशनच्या माध्यमातून अध्ययन प्रक्रिया वृध्दिगत करते.
7. शिकणे आणि वापरल्यास सोपी आहे.
8. वेळेची बचत करते. आकृत्या रेखाटण्यासाठी आणि ब्लँक बोर्डावर लिहिण्यात वेळ घालवावा लागत नाही.
9. आलेख व मुळआकृत्या (ओरीजनल) न बदलता परिपूर्णरीत्या पून्हा काढता येतात.
10. आकृत्यामधील ॲनिमेशन जलद आकलनासाठी मदत करते.
11. बहूमाध्यमाच्या माध्यमातून कथन करणे आणि शिकण्याचा आकलन मोठा असून तो परिणामकारकही आहे.
12. व्हिडीओ, साऊंड, ॲनिमेशन, ग्राफीक्स आणि टेक्स्टच्या आंतरक्रिमे सह केलेला वापर विद्यार्थ्यांना अध्ययन कल (कर्व्ह) वाढवतो.
13. आंतरक्रियात्मक बहुमाध्यम अध्ययन उन्नत करुन शिक्षणाचा गुणात्मक दर्जा वाढवते. अध्ययन सक्रिय करुन प्राविण्य संपादण्यास त्याचा वापर करता येतो.
14. ते विद्यार्थ्यांच्या मनाला उत्तेजन देते आणि सर्व ज्ञानेंद्रियांचा वापर करुन शिकण्यास प्रवृत्त करते, कारण त्यात अनेक माध्यमांचा समावेश असतो.
15. बहुमाध्यम पध्दती ॲडिओ-व्हिडीओ, ग्राफिक आणि पाठयांश माहिती सादर करते. पुनस्थापित करते आणि प्रक्षेपण करते. विद्यार्थ्यांच्या समस्यचे निराकरण करण्याच्या क्षमतेवर या प्रकारच्या पध्दतीचा फार मोठा प्रभाव पडतो. ती सकारात्मक परिणाम करते.

अध्ययन साधन म्हणून ते फार मोठी उत्तेजना निर्माण करते. शाळा आणि घराच्या पारमपारिक मर्यादा ओलांडून ते विद्यार्थ्यांना स्वतःची वेळ आणि ठिकाणानुसार (सोईनुसार) स्वतःची अध्यापन साधने निवडण्यास साहयभूत ठरते.त्याचा क्लासरुम अध्यापनाशी थेट संबंध आहे. ते विविध चाचण्या आणि परिक्षांतील संभाव्य समस्याची उत्तरे देऊ शकते. ते सावकाश आणि पायरी पायरीने सादरीकरण करते. अध्ययनाचे द्रढीकरण करण्यासाठी शिक्षक स्लाईडचा पुन्हा पुन्हा वापर करु शकतात. अकारण अध्यापनानंतर चर्चा घेऊन उदिष्टे किती साध्य झाली हे पाहता येते.

बहूमाध्यम (नवीन) संकल्पना

विशेषत : संगणक या एकाच डिव्हाईसशी कोणत्याही प्रकारे तुलना करता येणार नाही. असातून निर्माण झालेले माध्यम एकच माध्यम ज्यात अनेक माध्यमांची वैशिष्टये आहेत. त्याला मल्टिमिडीया कॉम्प्यूटर असे म्हणतात. बहूमाध्यम पाठ व्याख्यानाचे बहुमिती किंवा स्लाईड शो मध्ये रुपांतर करतो. त्यास शिक्षक सहजपणे नकाशा, आलेख, तक्ता, प्राथमिक स्त्रोतांचे डॉक्युमेंन्टस आणि व्हिडीओ क्लिप दाखवू शकतो.

बहूमाध्यम अध्ययन उन्नत करुन त्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करु शकते. संशोधनातून असे आढळून आले आहे की, आंतरक्रियात्मक संगणक आधारित बहूमाध्यम वापरणा-या

विद्यार्थ्यांच्या रिटेंशन दर 30 टक्के असून तो पारंपारिक अध्यापनापेक्षा खूपच जास्त आहे.

बहूमाध्यमांचे घटक :-

माहितीचा सादरीकरणासाठी एकापेक्षा अधिक माध्यमे वापरण्यात येतात संगणकाच्या जगात माहितीच्या सादरीकरण्यासाठी मल्टिमिडीया, टेक्स्ट, ध्वनी, ग्राफीक्स (प्रतिमा) ॲनिमेशन (चलत्या प्रतिमा) या सारख्या एकापेक्षा अधिक माध्यमांचा वापर केला जातो.

1. टेक्स्ट :- टेक्सट फॉर्ममध्ये माहितीच्या सादरीकरणासाठी अल्फान्युमरिक कॅरॅक्टर्स वापरण्यात येतात. टेक्स्ट प्रोसेसिंगसाठी संगणकाचा मोठया प्रमाणावर वापर करण्यात येतो.

2. ग्राफीक्स :- संगणकाच्या सहाय्याने चित्रे डिस्प्ले करण्याशी याचा संबंध आहे. चित्रे म्हणजे उदाहरणाच्या साहाय्याने माहिती देण्याचा प्रभावशाली मार्ग होय. रेखाचित्रे, प्रतिमा, पेटिंग्ज आणि क्लिप आर्ट हे त्यापैकी होय.

3. ॲनिमेशन :- हे सलगता निर्माण चित्राच्या संयमातून मुव्ही फिल्मसारखाच (व्हिडीओ) द्रश्य परिणाम किंवा हालचाल दाखवणारे साधन या तंत्रातून अनेक प्रतिमा जलद गतीने सलगपणे दाखवून हालचालींना परिणाम निर्माण करता येतो.

4. 2 डी ॲनिमेशन :-

या ॲनिमेशनच्या साहाय्याने व्दिमिती प्रतिमांच्या साखळी निर्माण करुन पडदयावर त्या प्रतिमा हालन असल्याने दाखवता येते.

व्याख्याने आणि सादरीकरणाच्या माध्यमातून होणा-या निष्क्रिय अध्यापनाच्या उलट या माध्यमातून विद्यार्थी सक्रिय सहभाग घेवून शिकू शकतो. ते विद्यार्थ्यांच्या मनाला उत्तेजन देते आणि सर्व स्त्रोतांमधून शिकण्यास प्रवृत्त करते. कारण त्यात अनेक माध्यमांना समावेश केलेला असतो.

ए 3 डी ॲनिमेशन

व्हर्च्यअल रियालिटीसाठी वापरलेले ॲनिमेशन ज्यात एखादी गोष्ट त्रिमितीचा अभ्यास साधून वेगवेगळया दृष्टीकोनातुन पहाता येतो.

4. ऑडिओ :-

संगणकाच्या साहाय्याने रेकॉर्डींग आणि ऑडिओ किंवा ध्वनीचा ऑडिओ क्लिप्स साऊंड रेकॉर्डरंच्या मदतीने केलेले ध्वनीमुद्रण यांचे एकत्रीकरण.

5. व्हिडिओ :-

संगणकाच्या साहाय्याने रेकॉर्डिंग करणे, हालचालीच्या परिणाम साधण्यासाठी ठराविक गतीने सलग प्रतिमांचा डिस्प्ले (व्हिडीओ क्लिप्स) करणे.

6. हायपरलिंक :

टेक्स्ट अतिरिक्त माहितीला जोडणे

बहूमाध्यमांचा अध्ययन - अध्यापनात उपयोग :-

1. उदाहरणे देण्यासाठी
2. दुर्मिळ घटनाचे सादरीकारण
3. पाठयपुस्तकावर आधारित माहितीचे सादरीकरण
4. विद्यार्थ्याच्या ज्ञानाचे दृष्टीकरण करण्यासाठी
5. अध्यापनाची गुणवत्ता वाढीस लावण्यासाठी
6. अध्यापनाला गतिमान करण्यासाठी
7. क्षमतेनुसार अध्यापन करण्यासाठी
8. क्रियाशिल राहून अध्ययनासाठी विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी
9. मनोरंजनातून अध्यापनासाठी

संदर्भ ग्रंथ :-

1. डॉ. अर्चना अलोणी - शै. तंत्रविज्ञान व व्यवस्थापन
2. ह.ना. जगताप - प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान, पूणे नूतन प्रकाशन

बागलाण तालुक्यातील केळझर व हरणबारी जलप्रकल्पांची शेती विकासातील भुमिका

प्रा.उमेश मोहन पाटोळे
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग .
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सटाणा. जि.नाशिक.

सारांश :-

जलसिंचन म्हणजे शेतीस, जमिनीस वा एखाद्या ओसाड स्थळास, भूप्रदेशास कृत्रिमरित्या पाणीपुरवठा करण्याचे विज्ञान होय. जेथे पावसाचे प्रमाण कमी असते वा नगन्य असते तेथे अशी व्यवस्था करण्यात येते , ज्याद्वारे तेथे कृषीचा विकास होऊ शकेल. प्राकृतिक, आर्थिक, सामाजिक, व आर्थिक घटकाबरोबरच जलसिंचनप्रकल्प, नद्या,कालवे याचा प्रभाव त्या क्षेत्रातील पिक पद्धतीवर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. जलसिंचन ह्या साधनामुळे मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात वाढ दिसून आली आहे. भारतातील एकूण ४५० जिल्ह्यापैकी बागायत क्षेत्र असलेल्या ४४ जिल्ह्यामधून देशाच्या अन्नधान्याचे उत्पादनापैकी ५०% उत्पादन होते.या ४४ जिल्ह्यापैकी जास्त सिंचन क्षेत्र असणाऱ्या १४ जिल्ह्यात देशाच्या २५ % अन्नधान्याचे उत्पादन मिळते यावरून शेतीसाठी जलसिंचनाचे महत्व लक्षात येते.

प्रस्तुत शोधनिबंधात बागलाण तालुक्यातील केळझर जलप्रकल्प व हरणबारी जलप्रकल्पाच्या सध्यस्थितिचा आढावा घेवून त्या प्रकल्पाची तेथील कृषी विकासातील भूमिकांचा अभ्यास केलेला आहे .

प्रस्तावना :-

निसर्गातील अनेक साधन संपत्तीपैकी जल ही एक सजीवांसाठी एक महत्वाची साधन संपत्ती आहेमा .नवी हस्तक्षेपामुळे व निसर्गाच्या लहरीपणामुळे त्यांचे प्रमाण सातत्याने कमी होतांना दिसून येत आहेर्ण मानवाच्या संपू . आर्थिक प्रक्रिया व कृषी विकास हा नैसर्गिक जलसंपत्तीवर असून त्याचे महत्व मानवाला समजून आलेले आहे त्यासाठी . हल्लीच्या काळात जलसिंचन प्रकल्पाची बांधणी करून भूजल पातळी वाढवण्यासाठी धरणे , कालवे यांची बांधणी करून वेळोवेळी जल आवर्तनाच्या स्वरुपात तेथील पाणलोट क्षेत्राचा कृषीविकासासाठी केला जात आहे

प्रस्तुत शोध निबंधात बागलाण तालुक्यातील तापी नदी खोयातील मोसम नदीवरील हरणबारी जलप्रकल्प व - आराम नदीवरील केळझर जलप्रकल्प यांच्या जालासिंचानाचा वापर करून तेथील पाणलोट क्षेत्राचा कृषी , निष्कर्ष काढण्याचा पिक पद्धतीचा अभ्यास करून काही प्रयत्न केलेला आहे.

अभ्यास क्षेत्र-

बागलाण हा तालुका नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेस असून तो आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो.या तालुक्याच्या पश्चिम दिशेला गुजरात राज्य व कळवण तालूका, उत्तर दिशेला धुळे जिल्हा,पूर्वेला मालेगाव तालुका व दक्षिणेला देवळा तालुका आहे. बागलाण तालुक्याचे एकून

क्षेत्रफळ १९९३४,०३हेक्टर असून तालुक्यात १७२ गावांचा समावेश होतो.२०११ च्या जनगणनेनुसार बागलाण तालुक्याची लोकसंख्या ३७४४३५ इतकी आहे. बागलाण तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान सरासरी ४४८ मी.मी आहे तर आरम व मोसम या प्रमुख नदया आहेत. बागलाण तालुक्याच्या पश्चिमेस साल्हेर पर्वतावर आरम नदीचा उगम झाला असून हि नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत असून तिची एकूण लांबी ३६ किमी आहे.बागलाण तालुक्याचा अक्षवृतीय विस्तार २०°५४'उ ते २०° ५२'उ व रेखावृतीय विस्तार ७४°१२'पू ते ७४°५६' पू असा आहे.बागलाण तालुक्याच्या पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा असून साल्हेर हे महाराष्ट्र राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे उंचशिखर बागलाण तालुक्यात आहे.बागलाण तालुक्याचे पूर्व-पश्चिम अंतर ४४ कि.मी तर दक्षिण-उत्तरअंतर ३७ कि.मी आहे.



उद्दिष्टे .:

१) हरणबारी व केळझर जलप्रकल्पाचा अभ्यास करणे .

२) हरणबारी व केळझर जलप्रकल्पाचे बागलाण तालुक्यातील कृषी विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

३) हरणबारी व केळझर जलप्रकल्पाच्या बागलाण तालुक्यातील सिंचन क्षेत्राचा अभ्यास करणे.

सामुग्री संकलन व संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन निबंधाचा माहिती स्त्रोत हा प्राथमिक आणि दुय्यम पद्धतीचा असून ही माहिती क्षेत्र भेटीमुलाखत या साधनाद्वारे मिळवली असून दुय्यम , गव्हरमेंट गॅझेट ,स्वरुपाची ही माहिती पुस्तकीय संदर्भ शासकीय,निमशासकीय विभागातील नोंदी, संदर्भ ग्रंथातील माहितीचा उपयोग व इंटरनेटच्या मदतीने प्राप्त करून त्या माहितीवर सांखिकी साधनाचा वापर करून त्याचे प्रकटीकरण केले आहे.

विषय विवेचन-

हरणबारी जल प्रकल्प :

हरणबारी मध्यम प्रकल्पाचे बांधकाम तापी खो-यातील मोसम नदीवरील नाशिक जिल्ह्यातील सटाणा अंतराव.किमी ३५ शहरापासूनअंबापूर गावाजवळ करण्यात आलेले आहे. हरणबारी प्रकल्प अंतर्गत डावा उजवा सोमपूर व वाघळे कालवा व मोसम नदीवरील १८ बंधारे अंतर्भूत केले आहेत.

हरणबारी जल प्रकल्प :

१२१ हरणबारी प्रकल्पाचे पानलोट क्षेत्र.६० चौ.आहे.मी.कि. पाण्याची एकूण आवक ५१दलघमी ३१. असून उपयुक्त स◌ाठा ३३दलघमी इतका आहे ०२.. हरणबारी उजवा कालवा विस्तारीकरण व नुतनीकरण हे हरणबारी जलप्रकल्पा अंतर्गत करण्यात आलेले आहे . सुधारित प्रशासकीय मान्येतेनुसार व सुधारित १५ जालानियोजानानुसार हरणबारी उजवा कालवा हेक्टर ५७५मीपर्यंत काढून.किक्षेत्रास खरीप व रब्बी हंगामात शेतीसाठी पाणीपुरवठा होत आहे .हरणबारी उजवा कालवा १५ किमी १५ मी पर्यंत वाढवून.कि २५ वरून . १० मी पर्यंत कालव्याचे नुतनीकरण व पुढील.कि त्यासाठी हरणबारी .वाढीव कालव्याचा समावेश आहे.किमी २३ उजवा कालव्याची वहनक्षमता मूळ. ०० घ.फू प्रति सेकंद इतकी करण्यात आली आहे. हरणबारी उजवा कालवा विस्तारीकरण व नुतनीकरण २००६ मध्ये करण्यात आले व तदनंतर कालवा कार्यान्वित करण्यात आला.



हरणबारी प्रकल्पाचे प्रकल्पीय सिंचन

कालवा	क्षेत्र	आवश्यक पाणी (दलघफू)
डावा कालवा ७ कि.मी.	४०५ हेक्टर	
उजवा कालवा ७ कि.मी.	रब्बी ५७५ हेक्टर	२२९.00
सोमपूर व वाघाळे	१४१७ हेक्टर	१८१.00
मोसमसाळ कालवा वाढीव शाखा	५१८३ हेक्टर	४५४.00 +१९७.00
मोसम नदीवरील १८ बंधारे	२१४६ हेक्टर	५९२.00

एकूण	९७२६ हेक्टर	१६५३.00
	पा.त. भरणे	३०.00
	बाष्पीभवन	११३.00
	एकूण	१७९६.00

तालुका निहाय क्षेत्र :

हरणबारी प्रकल्प

तालुका	सिंचन क्षेत्र (हेक्टर)	पिक क्षेत्र (हेक्टर)
मालेगाव	५७९१	६१२६
सटाणा	३९३५	६०९९
एकूण	९७२६	१२२२५

केळझर प्रकल्प :

तापी खोयात आराम नदीवर नाशिक जिल्ह्यातील - मी.कि ३५ सटाणा शहरापासून पश्चिमेसअंतरावर तताणी गावाजवळ केळझर मध्यम प्रकल्प बांधण्यात आलेला आहे . सदर प्रकल्प १९८५ पासून सिंचन व्यवस्थेसाठी वर्ग झालेला आहे.

५४ सदर प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र.३९ .मी.कि.चौ. १९ पाण्याची एकूण आवक आहे.८२ दअसून .मी.घ.ल. १९ प्रस्तावित पाणी वापर.८२ दइतका .मी.घ.ल. धरणाचा.आहेएकूण साठा १७द १०..लअसून उपयुक्त .मी.घ. १६साठा.२२ द.इतका आहे.मी.घ.ल.

केळझर प्रकल्पाचे प्रकल्पीय सिंचन

तपशील	क्षेत्र	आवश्यक पाणी (द.ल.घ.फु.)
४ बंध-याकरिता निकवेल ते मुंजवाड	२७५ हेक्टर	५६.००
केळझर कालवा लाभ क्षेत्र	९४७ हेक्टर	३१८.००
सटाणा आराई फड	४५७ हेक्टर	१००.००
केळझर जलाशयातून उपसा सिंचन	५८ हेक्टर	१३.००
रब्बी क्षेत्र एकूण	१७७४ हेक्टर	४८७.00
खरीप शाश्वत व अशाश्वत क्षेत्र	१६२० हेक्टर	पूर पाणी
एकूण	३३९४ हेक्टर	४८७.००
सटाणा शहरासाठी पिण्याचे पाणी		९६.००
एकूण		५८३.००

हंगामनिहाय पिक क्षेत्र

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	प्रकल्पीय क्षेत्र (हेक्टर मध्ये)			
१	केळझर	खरीप	रब्बी	दुहंगामी	एकूण
		८८५	२४४५	५०९	५९९३

अ.क्र.	बंधारा/ कालव्याचे नांव	भिजणारे क्षेत्र(हे.)
१	केळझर डावा कालवा	९८४.००
२	निकवेल	६०.००
३	कंधाणे	७०.००
४	चौं धाणे	७५.००
५	मुंजवाड	७०.००
६	सटाणा	२६०.००
७	आराई-१	१४०.००
८	आराई-२	५७.००

- निष्कर्ष

प्राचीन काळापासून अनेक जलसिंचन पद्धती जगात अस्तित्वात आहेत.अनेक शतके विहिरी तलाव व नदया यांचा वापर जलसिंचनासाठी केला जात आहे.नदी-ओढ्यातून पाणी

वर खेचणे किंवा कच्चे बंधारेघालून पाणी वळवणे या गोष्टीही प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत.प्रस्तुत शोध निबंधात बागलाण तालुक्यातील तापी नदी खोयातील मोसम - नदीवरील हरणबारी जलप्रकल्प व आराम नदीवरील केळझर जलप्रकल्प यांच्या जलसिंचनाची भुमिका अतिशय महत्त्वाची असुन जलप्रकल्पांच्या मार्फत कालव्यांच्या मदती ने व नद्याना आवर्तन स्वरुपात जलपुरवठाकरून तेथील पाणलोट क्षेत्रसिंचित केले जाते. या जलसिंचनाच्या मदतीने खरीप व रब्बीहंगामात शेतीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ घडवुन आलेली दिसुन येते. त्याच बरोबर मोसम नदी वर १२छोटे बंधारे बांधलेले आले त्यांच्या जलसिंचनाच्या मदतीने शेती उत्पन्नात वाढ दिसुन येत आहे.

संदर्भ-

१) डॉ.विजया साळुंके / अंकुश आहेर – कृषी भूगोल
२) इंटरनेट
३) वर्तमानपत्र
४) पाट बंधारे विभाग , बागलाण

वृत्तपत्र माध्यमातील मराठी भाषेचे महत्व

डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे
सहयोगी प्राध्यापक,
वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभाग,
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी- 431401

प्रसारमाध्यमांमध्ये वृत्तपत्रांचे स्थान श्रेष्ठ आहे. वृत्तपत्र, नभोवाणी, दुरचित्रवाणी, इंटरनेट ही प्रमुख प्रसारमाध्यमे आहेत. यामधील वृत्तपत्र माध्यम सर्वात जुने, प्रथम आणि सर्वश्रेष्ठ म्हणावे लागते. मुद्रणाच्या शोधानंतर भारतात वृत्तपत्रे सुरु झाली. इंग्रजांनी भारतात वृत्तपत्रे सुरु केली. जेम्स ऑगस्टस हिक्की यांनी इ.स. 1780 मध्ये बेंगॉल गॅझेट हे पहिले वृत्तपत्र सुरु केले. बाळशास्त्री जांभेकर यांनी इ.स. 1832 मध्ये दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्रे सुरु केले. लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म गांधी, पं. जवाहरलाल नेहरु या समाजसुधारकांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी तसेच समाजसुधारणेसाठी वृत्तपत्रे सुरु केली. भारतामधील वृत्तपत्रांचा इतिहास वैभवशाली आहे. महाराष्ट्रात आज अनेक मराठी, वृत्तपत्रे आहेत. ते समाज, राष्ट्र विकासाचे जनजागृतीचे, प्रबोधनाचे आणि शिक्षणाचे कार्य करीत आहेत.

मनातील भावना विचार भाषेच्या माध्यमातून प्रगट केल्या जातात. दुसऱ्याचे विचार, भावना, भाषेमुळेच समजून घेता येऊ शकतात. भाषा हे आत्मनिवेदनाचे आणि सामाजिक विनिमयाचे सर्वश्रेष्ठ, प्रभावी आणि उपयुक्त माध्यम आहे. ही अशी भाषा वृत्तपत्र माध्यमामध्ये प्राण आणते. वृत्तपत्र माध्यम, पत्रकार आणि त्यांचे कार्य भाषेवर आधारित आहे. भाषेशिवाय वृत्तपत्र प्रकाशित करता येत नाही. वृत्तपत्राची भाषा ही आलंकारिक, साहित्यिक भाषेहुन वेगळी असते. त्यामध्ये अचुकता, सहजता, अर्थपूर्णता, मुद्देसुदपणा, विचारांची संगती आणि परिचित शब्दांचा वापर महत्वाचा असतो. वृत्तपत्राची भाषा ही समाजातील, देशातील, राज्यातील जनतेला कृती करण्यास उद्युक्त करणारी असावी. भाषेचं कार्य हे बुध्दी आणि भावनेशी संबंधित असल्याने वापर जपून विचारपूर्वक करावा लागतो.

महाराष्ट्रातील काही प्रमुख मराठी वृत्तपत्रे

महाराष्ट्र टाइम्स	जनसत्ता	जनशक्ती
महानगर	लोकसत्ता	सामना
संचार	महासत्ता	लोकमत
पुण्यनगरी	देशोन्नती	केसरी
सकाळ	देशदुत	गांवकरी
नवा काळ	पुढारी	नवशक्ती
ऐक्य	एकमत	

तक्ता क्र. 1

वृत्तपत्र माध्यमाचे स्वरुप

महाराष्ट्रातील तसेच मराठवाड्यातील मराठी वृत्तपत्रे ही आठ, दहा, बारा, चौदा, आणि सोळा पानांची आहेत. त्यामध्ये बातम्या, वृत्तलेख, छायाचित्रे, जाहिराती, अग्रलेख, लेख, स्फुटलेख, प्रासंगिक लेख, वाचकांचा पत्रव्यवहार इत्यादी स्वरुपाचा मजकूर प्रकाशित केल्या जातो. हा सर्व प्रकारचा मजकूर हा मराठी भाषेतून प्रकाशित केला जातो. सपांदकीय पान क्रं. 4 किवा 5 वगळता इतर सर्व पानांमध्ये बातम्या, वृत्तपत्रे, छायाचित्रे, जाहिराती असतात.

संपादकीय पानावर प्रामुख्याने अग्रलेख, लेख, स्फुटलेख, प्रासंगीक लेख, वाचकांचा पत्रव्यवहार प्रकाशित केले जातात. हा सर्व मजकूर मराठी भाषेच्या माध्यमातून वाचकांना दिला जाते.

वृत्तपत्राची मराठी भाषा

वृत्तपत्रे भाषेच्या माध्यमातून आपले माहिती, लोकशिक्षण, प्रबोधन, मनोरंजनाचे कार्य करीत असतात. वृत्तपत्राचे वाचक हे विविध स्तरातील असतात. अल्पशिक्षित, नवसाक्षर, शिक्षित, उच्च शिक्षित या सर्वांना वृत्तपत्र वाचून भाषेच्या माध्यमातून विचार, माहिती, ज्ञान, घटना- घडामोडी, समजून घ्याव्या लागतात म्हणून वृत्तपत्रातील भाषेची रचना ही सर्वमान्य असावी लागते. वृत्तपत्राची भाषा ही लोकभाषा

असावी. वृत्तपत्र वाचकप्रिय होण्यासाठी. भाषेचा महत्वाचा वाटा असतो. "जनसंचार माध्यम में भाषा एक स्वतंत्र माध्यम का रुप धारण करती हॅ । । पत्रकार को सामाजिक शिक्षक माना जाहा है, लेकिन उसकी भाषा और उसकी शिक्षा दोनों का बहुत महत्व होता है ।" मराठी भाषा हेच एक स्वतंत्र्य माध्यम असून त्यामुळे वृत्तपत्र माध्यम कार्यान्वित होत असते.

संपूर्ण वृत्तपत्रातील मराठी भाषा ही सरळ, साधी, सोपी, असावी. बोलीभाषेचा अधिकाधिक वापर करावा. सर्वमान्य नसले तरी सर्वांना परिचित असलेल्या शब्दांचा वापर महत्वाचा ठरतो. वाक्य छोटी-छोटी असावीत. त्यामुळे अर्थ समजून घेता येतो. नेमक्या अर्थाचे शब्द वापरणे अत्यंत महत्वाचे आहे. वृत्तपत्रातील जागा ही अत्यंत महत्वाची असल्याने पाल्हाळीत भाषा टाळावी. प्रभावी भाषेचा वापर, शब्दांचा वापर करावा. शब्दांची पुनरावृत्ती टाळावी. नेमका अर्थ निश्चित शब्दांव्दारे वाचकांपर्यंत पोहोचवावा. "विचार नेमक्या शब्दांत सहजपणे समजतील अशा पध्दतीने पत्रकारांना मांडावे लागतात त्यासाठी भाषा हे पत्रकाराचे प्रमुख इत्यार आहे. ज्यांची भाषा प्रभावी आहे तो उत्कृष्ट पत्रकार बनू शकतो. पत्रकाराचे भाषा प्रभुत्व समाजास कृती करण्यासाठी उद्युक्त करु शकतो. भाषेची जाण, पत्रकारास हवी. शब्दांचे जाण ही. शब्दांची नेमके अर्थ व वाक्यातील त्यांचे स्थान यांची माहिती हवी." अशा प्रकारे वृत्तपत्र माध्यमामध्ये भाषेला विशेष महत्व आहे.

वृतपत्रांमध्ये वापरले जाणारे मराठी भाषेतील सोपे आणि अवघड शब्द

सोपे शब्द	अवघड शब्द
धाड	छापे
नेमणूक	नियुक्ती
जोरदार	जोरकस
पुन्हा पुन्हा विचार	पुनर्विचार
पाणी	जल
नक्की	निश्चित
हॉटेल	रेस्टॉरंन्ट
भितीदायक	भयप्रद
मजबूत	भक्कम
आशा संपली	आशा संपुष्टात आली
तयार	सज्ज
जमा करणे	कलेक्शन
साप चावल्याने	सर्पदंशाने
बील	देयक
वाटप	वितरण
आधुनिक	अद्ययावत
दूर, वेगळे	वंचित
मरणे	दगावणे
पुन्हा तपासणे	पुनर्मुल्यांकन
फिस	शुल्क

तक्ता क्रं. 2

बातमीची भाषा

वृत्तपत्र वाचकांशी आपल्या भाषेव्दारे संवाद साधत असतात. वृत्तपत्रातील बातमी ही घटक सर्वाधिक वाचक वाचत असतात. वृत्तपत्र वाचण्यामागचा हेतू बातमी समजुन घेणे हाच असतो. त्यामुळे बातमीची भाषा सरळ असावी. शैली आधिकाधिक लोकांना आवडणारी असावी समजणारी असावी. वत्तपत्रात प्रमुख बातम्या या वृत्तसंस्थांकडून मुळ इंग्रजी भाषेतून येत असतात. त्या समान्य वाचकांना समाजणाऱ्या मराठी भाषेत द्यायच्या असतात. त्यामुळे कोणत्या इंग्रजी शब्दाला मराठी भाषेतील कोणता शब्द प्रतिशब्द म्हणून वापरायचा हे लक्षात आले पाहिजे. त्यासाठी वृत्तपत्र शैलीपुस्तिका (Style book) तयार करतात. नवनवीन शब्द रुढ करतात. उदा. विश्वसनीयरित्या समजते, सुत्राकडून सांगण्यात आले. प्रवक्ता म्हणाला. अशा या बातमीतील शब्दांमुळे वाचनीयता वाढते. विश्वसनीयता लक्षात येते. बातमीची वाचनीयता वाढावी म्हणून मुद्दाम असे शब्द रुढ केले जातात.

1945 मध्ये युनायटेड प्रेस असोसिएशन या वृत्तसंस्थेने वृत्तपत्रीय भाषेचे विश्लेषण केले आहे. बातम्यामध्ये वापरावयाच्या वाक्यांची लांबी, शब्दांचा अभ्यास केला. तो वृत्तपत्रांना मार्गदर्शक ठरला आहे. डॉ. प्लेश यांनी बातमीमध्ये लहान वाक्ये असावीत. प्रत्ययांचा कमीत कमी वापर असावा. व्यक्तिगत संदर्भ कमी असावेत असे सांगितले आहे. बातमीतील भाषा ही साधीच पण प्रभावी असावी. त्यामुळे बातमीच्या भाषेतही सौदर्य आणि जास्तीत जास्त आशय निर्माण करता येतो.

बातमीच्या भाषेतील क्रियापदे

1) बातमीमध्ये वाक्य एकमेकांना जोडण्यासाठी, परिच्छेदाची वाक्य संपवण्यासाठी अनेक शब्दांची योजना करावी लागते.उदा. "एसटी महामंडळाच्या वसमधून प्रवास करणाऱ्यांना जास्तीत जास्त सोयी पुरविण्यात येतील. असे एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष .... यानी सांगीतले. वाहकांनी प्रवाशांच्या या सोयीकडे लक्ष दिलेच पाहिजे असे सांगून ते म्हणाले, वाहक हा प्रवाशांचा सेवक असतो. एस.टी. महामंडळाच्या बसेस थांब्यावर थांबविल्या जात नसल्याचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. थांब्यावर बस न थांबविणाऱ्या वाहकाला प्रवाशांनी तंबी द्यावी असे मत त्यांनी व्यक्त केले."

प्रस्तुत बातमीच्या मजकुरामध्ये खालील क्रियापदांच्या वापर आहे.

1) असे सांगून ते म्हणाले 2) आरोप त्यांनी फेटाळून लावला. 3) असे मत त्यांनी व्यक्त केले.

या क्रियापदामुळे बातमी वाचायला सोपी होते. बातमीचा आशय चटकन समजतो. बातमी लवकर लवकर वाचता येते.

बातमीमध्ये वापरली जाणारी आणखी काही क्रियापदे किंवा विशिष्ट शब्द

म्हणाले	शिफारस केली
सांगितले	आश्चर्य व्यक्त केले.
सुचविले	नाराजी व्यक्त केली.
सूचना केली	खेद व्यक्त केला
दुर्लक्ष केले	नापसंती व्यक्त केली.
असा खुलासा केला	असे समर्थन केले.
प्रतिपादन केले	इन्कार केला
सूचना फेटाळून लावली	असे स्पष्ट केले.
आवाहान केले	आव्हान दिले.
ठामपणे सांगीतले	दुजोरा दिला.

वाक्यरचना

अनेक शब्द मिळून वाक्य तयार होते. अनेक वाक्यामधून म्हणणे, विचार, घटना सांगितली जाते. हे शब्द एकत्रित वाचल्यास त्याचा अर्थ समजतो. अनेक वाक्ये वाचल्यानंतर विचार, घटना समजतात. शुध्द आणि परिणामकारक वाक्यरचना, शब्दयोजना केल्यास त्या वाक्यांचा, शब्दांचा नेमका अर्थ स्पष्ट समजतो. कर्ता, कर्म, क्रियापद, यांचा क्रम व्यवस्थित लावल्यास वाक्य समजते. हा क्रम चुकल्यास वाक्याचा अर्थ समजून घेण्यास अडचण निर्माण होते. उदा.

। पुरग्रस्तांच्या पुर्नवसनासाठी मोठया प्रमाणात विचार झाला पाहिजे.

। मोठ्या प्रमाणावर पुरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी विचार झाला पाहिजे.

या वाक्यातील दोन शब्दांची अदलाबदल केल्यास वाक्य चूक कोणते हे लक्षात येते. डॉ. ना. गो. कालेलकर यांच्या मते "वृत्तपत्र हे भाषेच्या दृष्टीनेही आजच्या जगातील एक अत्यंत प्रभावी प्रचारसाधन आहे. त्यांनी योग्य शब्द आणि वाक्यप्रयोग वाचकांसमोर सतत ठेवले तर ते जितके अंगवळणी पडतील तेवढे ते इतर कोणत्याही साधनाव्दारे पडणार नाहीत." वृत्तपत्रे भाषेला अधिक परिणामकारक, कार्यक्षम बनवू शकतात. वृत्तपत्रामुळे भाषा ठाम आणि ठसठसीत होते. भाषेबद्दलची गोडी निर्माण करून ती जनसामान्यांमध्ये रुजविण्याचे काम वृत्तपत्रे करीत असतात.

वाक्याचे प्रकार

वाक्याचे वेगवेगळे प्रकार आहेत. त्याचा योग्य वापर वृत्तपत्रांन करावा लागतो.

1) प्रश्नार्थक वाक्य - तुम्ही महाविद्यालयात जाणार का ?

2) नकारार्थी वाक्य - आजारी असल्याने मी येवू शकत नाही.

3) उदगारार्थी वाक्य - अरे बापरे ! किती मोठे आहे हे !

4) विधानार्थी वाक्य - मी चांगल्या बातम्या आणतो.

5) अज्ञार्थी वाक्य - लवकरात लवकर निघून जा.

परिच्छेद

वृत्तपत्रातील वेगवेगळ्या लेखन घटकामध्ये योगय परिच्छेद आवश्यक असतात, त्यामुळे मुद्दा, विषय, प्रकरण वाचून समजावून घेणे सोपे जाते. अनेक वाक्यांचा मिळून एक परिच्छेद बनतो. बातमीचा पहिला परिच्छेद हा इंट्रो (लीड) म्हणून ओळखला जातो. त्यामधून बातमीचा विषय, आशय आणि महत्व ताबडतोब समजते. परिच्छेद किती लहान आणि मोठा असावा याबद्दल नियम नाही परंतु त्याचा आकार

ठरवित असताना वाचकांची सोय लक्षात घेतली पाहिजे. पत्रकाराने आपल्या सोयीनुसार परिच्छेद पाडू नये. प्रत्येक विचार, माहिती, घटना, कल्पना, बाब, एका परिच्छेदात समाविष्ट करावी. त्या त्या घटकाची माहिती त्याच स्वतंत्र परिछेदामध्ये संलग्नपणे द्यावी. थोडी एका परिच्छेदात, थोडी दुसऱ्या परिच्छेदात घेणे चुकीचे ठरते.

चिन्हांचा वापर

मात्रा (ा) दोन मात्रा (ा), ऱ्हास वेलांटी, (ि), दिर्घ वेलांटी (ी), ऱ्हस्व उकार (ु), अनुस्वार (ं), अवतरण चिन्ह (‘ “ ” ’), स्वल्प विराम (,), प्रश्नचिन्ह (?), पुर्णविराम (.), अर्धविराम (;)

या सर्व चिन्हांना व्याकरणात अत्यंत महत्व आहे. त्यांचा नेमका अर्थ, उपयोग, महत्व माहित असावे. त्यामुळे शब्दांचा नेमका, अचूक अर्थ समजतो. बातम्या, वृत्तलेखांचे, मथळे देताना ही चिन्हे, आवश्यक तेथे गरजेप्रमाणे वापरावी लागतात. शक्यतो ही चिन्हे वापरू नये. जेव्हा अत्यंत गरज असते तेव्हाच विचारपूर्वक वापर करावा. नसता मोठे अनर्थ घडतात.

व्याकरण

कोणतीही भाषा व्याकरणाशिवाय असू शकत नाही. मराठी भाषादेखील याला अपवाद नाही. मराठी व्याकरणाच्यादृष्टीने भाषेचा वापर वृत्तपत्रात बरोबर केला पाहिजे. वृत्तपत्रातून प्रकाशित केलेला मजकूर व्याकरणशुध्द असावा. लिखित भाषा वेगळी असते. मौखिक भाषा वेगळी असते. वृत्तपत्रातील भाषा ही मौखिक असावी. पण तिला निश्चित रुप, स्वरुप देण्याचे काम वृत्तपत्राचे असते. यावेळी वृत्तपत्राने व्याकरणाचे नियम पाळले पाहिजेत तरच ती भाषा शास्त्रीयदृष्ट्या शुध्द ठरते. व्याकरणशुध्द शब्दामुळे भाषा समजते. नेमका शब्दाचा अर्थ समजतो. अर्थाचे बारकावे लक्षात येतात. वाक्यांची परिपुर्णता, अर्थपूर्णता समजते.

बातमीच्या भाषेतील क्रियापदे, नामाशी, कर्ता, कर्म यांच्याशी जुळणारी असावीत. वाक्य चुकीचे असले तरी ते चुकीचे आहे हे लोकांना समजण्यासाठी, अपूर्ण वाक्य लोकांना समजण्यासाठी ते बोलणाऱ्यांच्याच तोंडून घालण्यासाठी अवतरणात घ्यावे. असे केले तरच ते व्याकरणशुध्द ठरते; अन्यथा बोलणाऱ्याची चूक ही वाक्य प्रकाशित करणाऱ्या वृत्तपत्राच्या माथी मारली जाते, म्हणून याबद्दल वृत्तपत्रांनी दक्ष रहावे. बातमी, वृत्तलेखांमध्ये विशेषणे वापरु नये. केवळ वार्ताहरच नव्हे तर मोठे, अनुभवी पत्रकारसुध्दा ‘लोकप्रिय’, ‘दादा’, ‘मामी’, ‘काकी’, ‘ताई’, ‘झुंजार’, अशी विशेषणे वापरतात. ती वापरू नये.

संदर्भ :

1) कम्युनिकेशन टुडे - एप्रिल -जून 2011, भाषा के प्रश्न पर सोचने की आवश्यकता क्यों ?
शशी कान्त राय, पृष्ठ-107

2) संपादक प्रताप पाटील, वृत्तविद्या मूलतत्वे, जयदत्त प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमआवृत्ती 1994, पृष्ठ 15

3) पत्रकारांसाठी मराठी भाषा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नशिक. वृत्तपत्रविद्या प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुस्तिका

'तळ ढवळताना'काव्यसंग्रहातील जागतिकीकरणाचा शोध

प्रा.डॉ.आनंद वारके
मराठी विभाग,दूधसाखर महाविद्यालय,
बिद्री.ता.कागल.

उद्दिष्ट:

'तळ ढवळताना' या लहू कानडे यांच्या काव्यसंग्रहातील जागतिकीकरण या नव्या व्यवस्थेचा शोध घेणे.

लहू कानडे हे १९८० नंतर काव्य लेखन करणारे एक महत्वाचे कवी आहेत.क्रांतिपर्व(१९८३), टाचाटिभा (१९९६) व तळ ढवळताना (२०१२) हे त्यांचे आजवर प्रकाशित झालेले कवितासंग्रह आहेत.'क्रांतिपर्व'मधील विद्रोह,'टाचाटिभा'मधील सामाजिक संवेदन व्यक्त केल्यानंतर ते 'तळ ढवळताना'या काव्यसंग्रहात संपूर्ण समाज जीवनाकडे वळलेले आहेत.

नोकरीतील बदलीनिमित्त पाहिलेले समाज जीवन व त्यांना असलेले सामाजिक भान यातून या काव्यसंग्रहातील कविता जन्मास आलेली आहे.या कवितेत समकाळातील सामाजिक,राजकीय संवेदन व्यक्त झाले आहे.त्यातून लहू कानडे यांच्याकडे समकाळाशी असणारी समरसता दिसून येते.या समकालीनतेच्या संदर्भात लहू कानडे म्हणतात ,"समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व नाकारणारी दहशत आज अनेक वर्गामध्ये उगवली दिसते. त्याविरुद्ध आणि भांडवलशाहीने निर्माण केलेल्या शोषित आणि पिडीतांवरील अन्याय अत्याचाराविरुद्ध कलावंतांना, प्रतिभावंतांना उभं राहावंच लागेल. हीच समकालीनता आहे असं मी मानतो .त्या दृष्टीने माझी कविता सार्थकी लागावी एवढंच वाटतं"१

जागतिकीकरण हा आजच्या समाज जीवनातील महत्वाचा भाग आहे. जागतिकीकरणाचे पडसाद 'तळ ढवळताना'पडलेले आहेत. त्यामुळे त्यांची कविता लक्ष वेधून घेते.या कवितासंग्रहातील कवितेबद्दल महेंद्र कदम म्हणतात,"एक नवीन आणि समग्र समाजाला गिळंकृत करू पाहणारी एक राजकीय व्यवस्था जागतिकीकरण या रूपाने आलेली आहे. ही व्यवस्था खूप महाकाय आणि विनाशकाली आहे.या व्यवस्थेला नकार द्यायचा असेल, तर संपूर्ण सर्वहारा समाजाला नकाराच्या बाजूने उभं करावं लागेल. संपूर्ण शोषित समाज नकाराच्या भूमिकेत उभारला तरच हे अराजक थांबवता येईल, या जाणिवेने 'तळ ढवळताना'मधील कविता आकाराला आलेली आहे." २

१९९० नंतर जग अधिक गतिमान झाले. जागतिकीकरण, खासगीकरण,उदारीकरण व माहिती तंत्रज्ञान या बाबींचे परिणाम मानवी जीवनावर दिसू लागले.भांडवलशाहीने समाज जीवनावर एकच परिणाम सुरु झाला.जागतिकीकरणाने समाजाचे शोषण सुरू झाले.काही विचारवंत जागतिकीकरणाने समाजाचा विकास होईल असे म्हणतात.लहू कानडे मात्र जागतिकीकरणाकडे उपहासाने पाहातात.लहू कानडे यांच्या 'तळ ढवळताना'या काव्यसंग्रहात आलेले जागतिकीकरणाचे पडसाद पुढीलप्रमाणे सांगता येतील.

त्यांची कविता जागतिकीकरणाच्या काळातील शोषण मांडताना दिसते.जग एक खेडे बनविण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण. जगातील प्रत्येक व्यक्तीचे जीवनमान उंचावणार अशी हमी या समाज व्यवस्थेने दिली.१९९० ते २०१२ या वीस बावीस वर्षाच्या काळात मात्र जागतिकीकरण काही व्यक्तीपर्यंत पोहोचले नाही. काही व्यक्तींचे शोषण सुरूच राहिले. ते कवीला दिसते. जागतिकीकरणामुळे माणसाचा जेवढा उद्धार व्हायला हवा तेवढा कवीला दिसत नाही. संवेदनशील वृत्तीचे कवी लहू कानडे अस्वस्थ होतात. या संदर्भात अनंत राऊत म्हणतात ,"'तळ ढवळताना'मधील लहू कानडे यांची कविता खासगीकरण व उदारीकरणाच्या माध्यमातून होणाऱ्या आजच्या जागतिकीकरणाच्या तळस्तरातील अनेक समाज घटकांवर कसा परिणाम होत आहे याची तीव्र जाणीव करून देते."३

भारताला स्वातंत्र्यमिळाले त्यानंतर भारतातील तळागाळातील लोकांना वाटले की आता आपले जीवनमान उंचावणार आहे. स्वातंत्र्य आपल्याला काही तरी देईल. पण ही त्यांची अपक्षा फोल ठरली. नव्वदनंतर सुरू झालेले जागतिकीकरण तर जगासाठी उपयोगी पडेल असा आभास निर्माण करण्यात आला.पण जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. वीस वर्षे उलटली तरी त्याचा सामान्य माणसाच्या जीवनाला काय उपयोग झालेला नाही .जागतिककरण माणसाला जगण्याची रीत देऊ शकले नाही . या काळातही विविध समाजातील माणूस अंधारातच राहिला. ते म्हणतात,

" मीही पाहिली आहे थोडीशी दुनियादारी
ग्लोबलायझेशनला नादवलेली पोरं अन् पोरी
माझ्याही स्वमध्ये दरवळतोय जागेपणाचा वास
अवघा रक्तबंध अंधारात म्हणून"

जागतिकीकरणात माहिती तंत्रज्ञान युग आले.माहिती तंत्रज्ञानाने अनेक गोष्टी आणल्या. मल्टीमिडिया हे माहिती तंत्रज्ञानाचे अपत्य आहे. कवीला मात्र मल्टीमिडिया म्हणजे भांडवलदारांनी सामान्य माणसाला दाखवलेले गाजर वाटते. हायटेक व्हा अशा संदेशाची घंटा गळ्यात बांधून मिरवणारे मांजर वाटते.हे नवे तंत्रज्ञान माणूसपण नाकारत असेल तर एकविसाव्या शतकाचे स्वागत कसे करावे हा कवी समोरचा प्रश्न आहे.या काळाने श्रीमंत गरीब दरी कमी करण्यापेक्षा वाढवलेली दिसते. धनिक अधिक झालेला दिसतो. या काळात कवीची दृष्टी झोपडपट्टीतील माणसाच्या जीवनापर्यंत पोहोचते.कवी म्हणतात ,

"तुझ्या स्वागतासाठी अब्जावधींचा धूर करून
उजळताहेत लक्ष लक्ष ज्योती
आणि मी गोळा करीत सुटलोय
तेल संपलं म्हणून विझू विझू झालेल्या
असंख्य झोपड्यतील वाती"

जागतिकीकरणात तंत्रज्ञान, मिडिया,डिजिटल कॅमेरे आदिवासी जीवनापर्यंत पोहोचतात. ते आदिवासींच्या सुंदर संस्कृतीचे चित्रिकरण करतात. चित्रिकरण जगाला दाखवितात. चित्रिकरण जगाला दाखवून पैसा मिळवितात .पैसा मिळवून गब्बर होतात.जागतिकीकरणाने दिलेल्या या गोष्टींनी भांडवलदारानाच मोठे केले. घुंगूरमाळा, डुले, अंजन, पैजण,मोर पिसांचा टोप परिधान केलेले आदिवासी कवीला ज्ञानी वाटतात. मल्टीमिडिया मात्र त्यांना अज्ञानी समजतो. येथे त्यांचे शोषण होताना दिसते.ते केवळ आदिवासींचे गुणगान करतात. त्यांचे जीवनमान उंचावावे यासाठी एक शब्दही मिडियावरून सांगत नाहीत.याबद्दलचा राग व्यक्त करताना कवी म्हणतो,

"पण हा हरएक अनवाणी लटका
हातात कत्ती पकडलेला
अग्निप्रकाशात केवढा सुंदर दिसत होता
हे कधीच छापलं जाणार नाही."

जागतिकीकरणात लोकसेवक तळागाळातील माणसाशी कसा वागतो य त्यांचे शोषण कसे करतो याचे वर्णन लहू कानडे यांच्या कवितेत येते. आदिवासींचे संरक्षण करण्यासाठी आलेला अधिकारी आदिवासी मुलीचे लैंगिक शोषण करताना दिसतो. आदिवासी मुलीवर बलात्कार करतो. तिचा सांभाळ करण्याचे अभिवचन देतो. त्या मुलीने अजाण वयात पाहिलेली स्वप्ने कुसकरून टाकतो. या बाबींने कवी अस्वस्थ होतात.ते म्हणतात,

"राजकुमार निवडायची तिची आस
मात्र धुळीला मिळाली
जसा गारांच्या मायात
आंब्याचा गच्च बहर
झडून जावा क्षणार्धात"

अशा आदिवासींना मग कवी समाज व्यवस्था नाकारण्याचे आवाहन करतो.कवी म्हणतात,

"नाकार फक्त निमूटपणे जगायचं
गुलामासारखं,कायदेशीर विचार,
आमच्या विकासाचे पैसे कुठे गेले ? विचार ,विचार ,विचार
आमच्या चोचीतले दाणे कुणी लुटून नेले ?"

जागतिकीकरणाच्या काळापर्यंत गावागावात संडासची सोय नाही. सामान्य जन उघड्यावर शौचाला बसतात.हे पाहून कवी व्यथित होतो.एक अंमलबजावणी अधिकारी म्हणून ते काम करतात. 'निर्मल ग्राम'सारखी योजना राबवतात. सरकारला ही योजना राबवण्यासाठी भाग पाडतात. त्या योजनेची कठोर अंमलबजावणी करतात. या मोहिमेस 'हागणदारी मुक्त गाव' असे नाव देतात.हे नाव देताना काही जणांना संकोच वाटतो. योजनेचा अर्थ कळाला तरच बदल होईल.हागणदारी शब्द वापरला तरच समस्या दूर होईल. योजनेला हे नाव देण्यासाठी ते मोठ्या धाडसाचे पाऊल उचलतात.आपल्या विचाराशी ठाम राहतात. 'निर्मल ग्राम' ची तपासणी करताना एक म्हातारी त्यांना भेटते. जागतिकीकरणाच्या काळात संडास बांधल्याचा आनंद व्यक्त करते. तिच्या आनंदाचे वर्णन करताना कवी लिहितात,

" मावशी मुरकली थोडीशी हरकली, गहिवरून म्हणाली,
लेकरानू कितीरं उशीरा भेटलासा
आता खरंच जगावसं वाटतं बिनघोर "

वीस वर्षे जागतिकीकरण खेड्यापर्यंत पोहोचत नाही . या विचाराने कवी अस्वस्थ होतो. त्यांची कविता खेड्यातील प्रतिनिधिक चित्र स्पष्ट करते. आता गावे स्वच्छ सुंदर झाली आहेत.गावांना सरकारी बक्षीसे मिळाली .खऱ्या अर्थाने गावी सुंदर झाली नाही असे कवीला वाटते .खेड्यातील लोकांचा कारभार पाहाणारी ग्रामपंचायत अजूनही उघडली जात नाही. खेड्यात पैशातून सत्ता आणि सत्तेतून धन कमविण्याचं प्रशिक्षण दिलं जातं. खेड्यातही भांडवलदार निर्माण होतील अशी भीती वाटते.लोकशाही शासनव्यवस्थेत ही स्थिती निर्माण झाली आहे हे महत्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या काळात सरकारचे काही फतवे गावात पोहोचतात. डास मारण्यासाठी रॉकेलची फवारणी करा. पाणी उकळून व गाळून प्या.डास चावू नयेत म्हणून मच्छरदाणी बांधा.चौरस आहार घ्या.पण ज्यांच्याकडे जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत सुविधा नसतील तर त्यांनी कसे जगायचे हा कवीने समाजव्यवस्थेसमोर मांडलेला प्रश्न आहे.दिवा पेटवायला रॉकेल नाही.प्यायला पाणी नाही.राहायला जागा नाही. अशा

लोकांनी कसे जगायचे हा प्रश्न आहे.जागतिकीकरण या समस्या सोडवू शकत नाही ही कवीची खंत आहे.आजही लोकांना पाण्यासाठी दाहीदिशा भटकावे लागते. पाचटाच्या खोपटात राहावे लागते.त्यांना घासभर अन्न मिळत नाही.या मूलभूत सुविधां उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मात्र सरकार टाळते.अजूनही सर्व सामान्यांचे जीवन असेच आहे हे लहू कानडे सूचित करतात. अशा व्यवस्थेविरुद्ध संताप व्यक्त करताना कवी लिहितात,

"हागायचं नगं,जगायचं कसं ?
तेवढे सांगा ना दादानू "

स्वातंत्र्य,समता,बंधुत्व या मूल्यांची देणगी देशाला मिळाली.त्यामुळे सामान्य लोकांना काही अधिकार मिळाले. त्यामुळे पिढीजात मक्तेदार अस्वस्थ झाले.सामान्यांना न्याय देण्यासाठी ग्रामसभा ही नवी व्यवस्था आली. येथेही शहाण्यांचीच गर्दी झाली.त्यांनी समानता मिळविण्यासाठी जात बदलून घेण्याचा नवा फंडा शोधला आहे.

जागतिकीकरण माणसाला उद्ध्वस्त करणारा एक नवा डाव आहे असे कवीला वाटते.गावागावात व्यायाम शाळा निघाल्या. येथे शरीरयष्टी कमविण्याचे प्रशिक्षण मिळायला हवे.या ठिकाणी दहशत माजविणाऱ्या टोळ्या निर्माण होत आहेत. त्यांना भांडवलदारांचा पाठिंबा असतो.येथे कलावंतांच्या कलेची आणि कौशल्याची चोरी केली जाते.त्यांची प्रतिभा कवडीमोलाने विकत घेतली जाते.सामान्यांना फसवणारे, नफेखोर या व्यवस्थेने तयार केले आहेत.रिॲलिटी शोच्या नावाखाली मानवी देहाचा बाजार मांडला जात आहे. या संदर्भात अनंत राऊत म्हणतात,"स्वातंत्र्य,समता व सामाजिक न्यायाच्या भूमिकेला फाटा देऊन गाव करीन ते राव काय करीन म्हणत म्हणत सरंजामदारांचीच हुकूमशाही व्याणारी (व्यालीस) ग्रामसभा आदी चिंताजनक गोष्टीही कवीने फार ताकदीने मांडलेल्या आहेत."४ माणसाला हैराण करणारे हे वेगळेच रोग या व्यवस्थेत जन्माला आले आहेत.नफेखोरांनी ही सगळी मालमत्ता खासगी करून टाकलेली आहे.या मालमत्तेतून ते कोट्यवधींची लूट करीत आहेत.

स्वातंत्र्यानंतर या देशातील विषमता नष्ट होईल असे वाटले.जात नावाची अतिशय शोषण करणारी बाब नाहीशी होईल असे वाटले. 'जग एक खेडे' झाले या संकल्पनेला घेऊन अवतरलेल्या जागतिकीकरणाने तरी ती पुसून टाकली जाईल अशी अपेक्षा होती.जातीपातीतील माणसांना मुक्त जीवन जगता येईल असा आशावाद होता. जागतिकीकरणाने जातीपातीत जीवन जगणाऱ्या माणसांचा भ्रमनिरास केला.या काळातील माणसांनाही मग कवीला नकार शिकवण्याची गरज पडली. जातिअंताचेसॉप्टवेअर देशाच्या महासंगणकात बसवायला कोणीच तयार नाही. हे शल्य कवीला आहे.म्हणून कवी म्हणतो ,

"माझ्या स्क्रीनवरून मात्र डिलीट करतोय मी समूळ
हे अघोरी अभद्र कडू
नाकारतोय मी
माझ्या डोळ्यातील जात नावाचे रडू "

अस्पृश्यता,जातीयता निर्मूलन होत नाही.माणसाला अजूनही हीन वागणूक मिळते.अपमानीत जीवन जगावे लागते. गुलामीचे जीवन,वर्णद्वेष अशा व्यवस्थेविरुद्ध कोणीच उठाव करीत नाही.असा उठाव करू नये अशी व्यवस्था त्यांनी करून ठेवलेली आहे.सगळ्यांचे हात बांधलेले आहेत.स्वातंत्र्यपूर्व व स्वातंस्वातंत्र्योत्तर काळात अनेक समाजसुधारकांनी हे समाजाला दाखवून दिले.पण असे सुधारक निर्माण होऊ नयेत अशी स्थिती करून ठेवलेली आहे.

जागतिकीकरण कवींचे स्वातंत्र्यहिरावून घेईल असे कवीला वाटते. कवीला अशाच टप्यावर चिरडल्या गेलेल्या कवी आणि विचारवंतांची आठवण होते. त्यांचे विचार सुरुवातीलाच गाढले जातात. मोलाईस हे कवी आठवतात. मरियन मकेबा ही संगीत गायिका आठवते.त्यांनी आपल्या कवितेतून व संगीत गायनातून कलावंताचे स्वातंत्र्यजगाला दाखविले.वर्णभेद संपविण्याचा प्रयत्न केला.पण त्यांच्या या विचारांना पायदळी तुडविले गेले.जागतिकीकरणाच्या काळात त्यांचे हे विचार आपल्या कवितेत यावेत.आपल्या कवितेने त्यांच्यासारखाच संघर्ष मांडून समाज शुद्धीकरणाचे पाऊल उचलावे असे कवीला वाटते.म्हणून कवी म्हणतात,

"ग्लोबलायझेशनच्या उंबरठ्यावरच
चिरडले तुला
जसे पाया भरतानाच गाडायचे बळी"

जागतिकीकरण ही नवी व्यवस्था चांगला समाज निर्माण करू शकली नाही. त्यामुळे कवीला या काळातही म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज, छ. शिवाजी महाराज, गोपाळ हरी देशमुख,यशवंतराव चव्हाण यांची व त्यांच्या विचारांची गरज वाटते. जागतिकरणात नवी व्यवस्था निर्माण झाली. कार्यालये निर्माण झाली. नव्या आणि जुन्या कार्यालयात सामान्यांची अडवणूक पूर्वीपेक्षाही भयंकर झाली.ही परिस्थिती पाहून प्रशासकीय अधिकारी असणारे लहू कानडे अस्वस्थ होतात.

जागतिकीकरणाने नफेखोर,भांडवलदार निर्माण केले.या सर्वांना लहू कानडे सोपे सिध्दांवाले म्हणतात. त्यांचे अनेक

सिध्दांत आहेत.अधिक संपत्ती निर्माण केली की गरिबी नाहीशी होईल असे त्यांना वाटते.कुशल ,अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध होईल.कुपोषित,दुबळे,मुले,मुली असे कोणी उपाशी मरणार नाहीत असे वाटते .यामुळे भांडवलशाहीच निर्माण होणार आहे.भांडवलदारांनीच थाट मांडला तर गरिबी कशी दूर होईल. 'सेज संस्कृती' जागतिकीकरणाचे हे आणखी एक अपत्य मानायला हरकत नाही.सेजने अनेक शेतकऱ्यांची जमीन गिळंकृत करून टाकली. त्यांना देशोधडीला लावले.सोप्या सिध्दांताचा हा परिणाम आहे. त्यांनी बी.ओ.टी.आणली. तिचा ठेका मात्र बड्या लोकांनाच मिळाला.त्यामुळे गरिबांचे खिसे रिकामे होऊ लागले. शेतकऱ्यांचा माल फुकापासरी घेऊन मॉलमधून विकला जाऊ लागला .समोरच्याच व्यक्तीबरोबर बोलण्यासाठी मोबाईल आला .फुकटचे बोलणे या व्यवस्थेने विकतचे करून टाकले.या सगळया व्यवस्थेत सामान्य माणसाचे जगणेच मुश्कील झाले. सव्वीस रुपयात पोटापुरते जीवन मिळते असेही सरकारने जाहीर केले आहे. जागतिकीकरणात अख्खा समाज गिळायला बसलेली यंत्रणा निर्माण झालेली आहे.ती पृथ्वीवरील हरएक गोष्टींचे शोषण करीत आहे. केवळ माणूसच नव्हे तर समुद्र, वारा, चारा ,गुरेढोरे ,वनस्पती या सर्वांचे शोषण त्यांनी मांडले आहे . जागतिकीकरणात यज्ञयाग वाढले आहेत.या सर्वांकडे पाहण्यासाठी त्यांना वेळ नाही .त्यांच्या या कृतीबद्दल कवी म्हणतात,

"सोपे सिद्धांतवाले आता खूप फास्ट झालेत
त्यांना वेळ नाहीय इथलंच रडण्यात
ते ग्लोबल झालेयत
त्यांना नोबेल खुणावतय"

जागतिकीकरणाने कॉम्प्युटर, टीव्ही ,मोबाइल ,लॅपटॉप यासारखी चौकोनी खोकी माणसाच्या हातात दिली. त्यातून ते नवी संस्कृती शिकवताहेत. आदिवासी, झोपडपट्टीत आता डिजिटल युग निर्माण होईल असे त्यांना वाटते.डिजिटल युग पेलण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याची जबाबदारी मात्र ते घेताना दिसत नाहीत. या डिजिटल युगामध्ये ही माणसं गुदमरून जातील अशी भीती कवीने व्यक्त केली आहे.

निष्कर्ष :

१.'तळ ढवळताना'मधील लहू कानडे यांची कविता वर्तमान काळाला य समकाळाला भिडताना दिसते.

२.'तळ ढवळताना'मधील लहू कानडे यांची कविता जागतिकीकरणात सामान्य लोकांचे जीवन दर्शन घडविते.

३.'तळ ढवळताना'मधील लहू कानडे यांची कविता जागतिकीकरणाची चिकित्सा करताना दिसते .

४.'तळ ढवळताना'मधील लहू कानडे यांची कविता जागतिकीकरण सामान्य माणसाचे जीवन परिवर्तन करू शकले नाही हे दाखवून देते.

संदर्भ:

१.कानडे लहू,'तळ ढवळताना',लोकवाङमय गृह,मुंबई,तिसरी आवृत्ती,२०१४,प्रस्तावना

२.कदम महेंद्र,टाचाटिभ्याचे क्रांतिपर्व (संपादन),अक्षर वाङमय प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती,२०१७,पृ.१८

३.अनंत राऊत,टाचाटिभ्याचे क्रांतिपर्व (संपादन),महेंद्र कदम,अक्षर वाङमय प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती,२०१७,पृ.२५९

४.अनंत राऊत,टाचाटिभ्याचे क्रांतिपर्व (संपादन),महेंद्र कदम,अक्षर वाङमय प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती,२०१७,पृ.२६१

नागपूर जिल्हयातील भूमी उपयोजन व पिकांचा क्षेत्रीय अभ्यास

डॉ. अंकुश ना. बारमाटे
सहाय्यक प्राध्यापक
भूगोल विभाग प्रमुख
श्री चक्रपाणी कला महाविद्यालय
हुडकेश्वर रोड, नागपूर

सारांश

भारत देश हा कृषी प्रधान देश आहे. भारत देशात ६५ टक्केपेक्षा अधिक लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. भारत देशात लाखो हेक्टर क्षेत्र पिकांखालील व्यापलेले दिसून येते. भारत देशात वाढणारे पिकांचे क्षेत्र आणि भूमीउपयोजनांचे क्षेत्र याचा विस्तार होतांना दिसून येतो. शेतीवर भारताची अर्थव्यवस्था मोठ्या स्वरूपात अवलंबून आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचा वाटा मोठा आहे. भारतात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शेती व्यवसाय करण्यात येतो. नागपूर जिल्हा हा विदर्भात महत्वाचा जिल्हा आहे. या जिल्हयात ग्रामिण भागात शेती व्यवसायात गुंतलेले अनेक लोक आहेत. नागपूर जिल्हयात भूमीउपयोजनांचे स्वरूप बघता नागपूर जिल्ह्यात शेतीकरीता मोठी भूमी उपयोगात आणली जाते. या शेतीवर विविध पिके घेण्यात येतात. शेकडो हेक्टर क्षेत्र नागपूर जिल्हयात याकरिता उपयोगात आणलेले दिसून येते. नागपूर जिल्हयाचा व शहराची वाढ व विस्तार तसेच विकास बघता नागपूर जिल्हयातील भूमी उपयोजन आणि पिकांचा क्षेत्रीय अभ्यास करणे आवश्यक ठरते.

बिजसंज्ञा :- भूमी उपयोजन, कृषीचे क्षेत्र, पिके.

प्रस्तावना

नागपूर जिल्हा हा कृषीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा जिल्हा आहे. या जिल्हयात शेती योग्य भूमी अधिक आहे. विविध पिकांखालील वापरल्या जात असलेल्या जमिनीचे क्षेत्र मोठे आहे. नागपूर जिल्हयात ग्रामीण भागात शेती करणारे व त्यावर उदरनिर्वाह करणारी लोकसंख्या मोठी आहे. नागपूर जिल्हयात ६५ टक्के पेक्षा अधिक लोक शेती व्यवसायात गुंतलेले दिसतात. नागपूर जिल्हयात कोरडवाहू शेतीचे क्षेत्र मोठे आहे. शेती खालील एकूण भूमी उपयोजनापैकी ७० टक्के क्षेत्र कोरडवाहू शेतीखालील आहे. कोरडवाहू शेती ही संपूर्णत: पडणारे पर्जन्य यावर अवलंबून आहे. वाढणारी लोकसंख्या, वाढणारे भूमी उपयोजन आणि कृषीच्या क्षेत्रात होणारी वाढ यातून नागपूर जिल्हयात विविध आर्थीक बाबींची पूर्तता होत असल्याचे नागपूर जिल्हयात आढळते. भूमी उपयोजनांचा आणि विविध पिकांखालील उपयोगात येणाऱ्या भूमीचा अभ्यास नागपूर जिल्हयातील एक अर्थार्जनाचा आणि अर्थव्यवस्थेचा अभ्यास याव्दारे करता येतो.

अभ्यास क्षेत्र

नागपूर जिल्हा तहसिल नकाशा

नागपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्यात विदर्भ क्षेत्रात आहे. नागपूर शहर हे भारतातील मध्यवर्ती शहर आहे. नागपूर जिल्हयाचे क्षेत्रफळ ८२५३ चौ.की.मी. आहे. नागपूर जिल्हयाचे स्थान २१°४५' उत्तर अक्षांश ते २०°३०' उत्तर अक्षांश आहे आणि ७८°१५' पूर्व रेखांश ते ७९°४५' पूर्व रेखांश या दरम्यान आहे. महाराष्ट्रात लोकसंख्येमध्ये नागपूर

जिल्हयाचा तीसरा क्रमांक आहे. ४५,००,००० लोकसंख्या इ.स. २०११ या वर्षाच्या जनगणनेनुसार आहे. नागपूर जिल्हयात ६,१५,००० हेक्टर भूमी कृषी खालील उपयोगात आहे. या जिल्हयात कापूस, सोयाबीन, तांदूळ, गहु आणि इतर पिकांचे क्षेत्र आहे.

माहीतीचे संकलन आणि संशोधन पध्दती

नागपूर जिल्हयातील भूमी उपयोजन आणि पिकांचे क्षेत्र या शोधपत्रिकेचा अभ्यास करतांना व्दितीय माहीतीचे संकलन कृषी विभाग, लघू पाटबंधारे विभाग, विविध शासकिय कार्यालयांमधून गोळा केली. विविध सांख्यीकीय पध्दतीचा उपयोग करून सारण्याव्दारे माहीतीचे विश्लेषण केले आहे.

शोधपत्रिकेचा उद्देश

प्रस्तूत शोधपत्रिकेचा अभ्यास करण्याचा मुख्य उद्देश नागपूर जिल्हयातील भूमी उपयोजनाखालील क्षेत्राचा अभ्यास करणे तसेच विविध पिकांखालील क्षेत्राचा अभ्यास करणे आहे.

माहीतीचे विवेचन

मानव सभ्यतेच्या उद्योत्सवात कृषी क्षेत्र ही प्रमुख प्रगती होती. शेतीमध्ये अन्न निर्माण करता आले आहे. हजारो वर्षापूर्वी शेतीचा इतिहास सुरू झाला आहे. शेतीमध्ये अन्नधान्य निर्माण झाल्याने मानवास शहरात वास्तव्य करता येऊ लागले.

नागपूर जिल्हा हा पर्जन्यात फारसा प्रगत नाही. या जिल्हयात सर्वात जास्त शेती कोरडवाहू स्वरूपाची करण्यात येते. ही शेती पावसाळा ऋतूत पडणाऱ्या पावसावर अवलंबून आहे. या जिल्हयात पावसाळा ऋतूत सर्वात जास्त पर्जण्य पडतो. नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे सर्वात अधिक पर्जन्य पडतो. ईशान्य मौसमी वाऱ्यामूळे या जिल्हयात कमी पर्जन्य पडल्याचे दिसून येते. हिवाळा .ऋतूत आणि उन्हाळा ऋतूत अत्यंत कमी पर्जन्य या जिल्हयात पडतो.

सारणी क्र. १

नागपूर जिल्हा पर्जन्य

अ. क्र.	पर्जन्य	सरासरी पर्जन्य (मि. मी.मध्ये)	सरासरी पर्जन्याचे दिवस
१	नैऋत्य मौसमी वारे	९३६.१	४४.९
२	ईशान्य मौसमी वारे	७६.३	४.१
३	हिवाळा ऋतु	४९.८	३.६
४	उन्हाळा ऋतु	१९.९	१.९
	वार्षीक	१०८२.१	५४.५

स्त्रोत : नागपूर जिल्हा आकस्मीक कृषी योजना अहवाल-२०१७.

सारणी क्र. १ चा अभ्यास केला असता असे दिसून येते की, नागपूर जिल्हयात नैऋत्य मौसमी वाऱ्यामूळे पडणाऱ्या पर्जन्यांचे प्रमाण ९३६.१ मी.मी. आहे व पर्जन्याचे दिवस ४४.९ आहे. ईशान्य मौसमी वाऱ्यामुळे पडणारे पर्जन्य ७६.३ मी.मी. व पर्जन्य दिवस ४.१ आहे. तर हिवाळा व उन्हाळा ऋतूत अत्यंत कमी पर्जन्याचे दिवस आणि कमी पर्जन्य पडतो. नागपूर जिल्हयात वार्षीक पर्जन्य १०८२.१ मी.मी. पडतो व ५४.५ दिवस पर्जन्याचे असल्याचे आढळते.

सारणी क्र २

नागपूर जिल्हा भूमी उपयोजन

भोगोलिक क्षेत्र ००० हेक्टर	लागवडीचे क्षेत्र ००० हेक्टर	जंगला खालील क्षेत्र ००० हेक्टर	कृषी उपयोगात नसणारी भूमी ००० हेक्टर	चराई भूमी ००० हेक्टर	शेती योग्य कचरा भूमी ००० हेक्टर	विविध झाडे आणि पिकांची भूमी ००० हेक्टर	अयोग्य भूमी ००० हेक्टर	चालू भूमी ००० हेक्टर	इतर भूमी ००० हेक्टर
९८६	६३९	१५९	८७	५५	४१	१०	३४	६२	४०

स्त्रोत :- नागपूर जिल्हा आकस्मीक कृषी योजना आराखडा-२०१७

नागपूर जिल्हयातील भूमी उपयोजनाचे प्रारूप



सारणी क्र. २ या अभ्यासाने असे दिसून येते की, नागपूर जिल्हयात लागवडीचे एकूण क्षेत्र मोठे आहे. ६.३९ हेक्टर क्षेत्र कृषी लागवडीखालील आहे. यावरून नागपूर जिल्यात शेतीचे क्षेत्र मोठे असल्याचे आढळते. नागपूर जिल्हयात कृषी लागवडीनंतर सर्वात अधिक भूमी जंगल क्षेत्राखालील आहे. नागपूर जिल्हयात १.५९ हेक्टर जमीन जंगलाखालील आहे. इतर भूमी ही विविध उपयोगात कमी अधिक प्रमाणात आढळते.

सारणी क्र. ३

नागपूर जिल्ह्यातील शेतीचे क्षेत्र व पिके

अ. क्र.	पिके	खरिप क्षेत्र (००० हेक्टर)	अ. क्र	पिके	रब्बी क्षेत्र (००० हेक्टर)
१	सोयाबीन	३०५.५	१	गहू	४.१
२	कापूस	७४.८	२	हरभरा	४.४
३	भात	५८.१	३	ज्वारी (रब्बी)	२.३
४	तूळ	५७.१	४	इतर डाळी	१.८
५	ज्वारी	१७.२	५	इतर तेलबीया	०.४
६	भूईमूंग	५.७	६	जवस	०.४
७	मुंग	१.२			
८	उडद	१.२			

स्त्रोत :- नागपूर जिल्हा कृषी विभाग

सारणी क्र. ३ च्या अभ्यासाने नागपूर जिल्हयात खरिप कृषी खालील जमिन ३०५.५ हेक्टर आहे. सर्वात मोठे क्षेत्र सोयाबीन पिकाखालील आहे. कापूस पिकाचे क्षेत्र ७४.८ हेक्टर आहे. भात पिकाचे क्षेत्र ५८.१ हेक्टर आहे. इतर खरिप पिकांखालील क्षेत्र कमी आढळते. रब्बी पिकांखालील क्षेत्रात गहु ४.१ हेक्टर क्षेत्र व हरभरा पिकाचे क्षेत्र ४.४ हेक्टर आहे. इतर रब्बी पिकाचे क्षेत्र कमी प्रमाणात आढळते.

नागपूर जिल्हा खरीप व रब्बी पिके

नागपूर जिल्हयात खरिप पिकांमध्ये सर्वात अधिक पिकांखालील क्षेत्र सोयाबीन पिकाचे आहे. सोयाबीन हे नगदी पिक आहे. सुमारे ३०५.५ हेक्टर क्षेत्र सोयाबीन पिकाचे आहे. नागपूर जिल्हयात सर्वत्र सोयाबीन पिकांचे उत्पादन घेण्यात येते. सोयाबीन नंतर सर्वात अधीक पिकांचे क्षेत्र कापूस पिकांचे आहे. सुमारे ७४.८ हेक्टर क्षेत्र कापूस पिकाखालील आहे. सोयाबीन पिकाचे वाढते क्षेत्र नागपूर जिल्हयात मोठे आहे. कापूस पिकाचे क्षेत्र नागपूर जिल्हयात हळूहळू कमी झाल्याचे आढळते. खरिप पिकांत प्रमुख पिक म्हणून सोयाबीन पिकांचे वाढते महत्व नागपूर जिल्हयात दिसते.

रब्बी पिकांचे क्षेत्र नागपूर जिल्हयात कमी प्रमाणात आढळते. नागपूर जिल्हयात रब्बी पिकांचे सर्वात जास्त क्षेत्र गहू ४.१ हेक्टर व हरभरा ४.४ हेक्टर क्षेत्र आहे. गहु व हरभरा हे रब्बी पिकांचे प्रमुख क्षेत्र आहे. नागपूर जिल्हयातील खरिप पिकांचे क्षेत्र ९९ टक्के पेक्षा अधिक आहे व रब्बी पिकाखालील क्षेत्र अत्यंत कमी आहे. नागपूर जिल्हयात पर्जन्यावर आधारीत कोरडवाहु शेतीचे क्षेत्र अधिक दिसून.

निष्कर्ष

'नागपूर जिल्हयातील भूमी उपयोजन व पिकांचा क्षेत्रीय अभ्यास' या शोधपत्रिकेचा अभ्यास करतांना अनेक निष्कर्ष निघालेले आहेत. त्यापैकी प्रमुख निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे.

(१) नागपूर जिल्हयात लागवडीचे क्षेत्र अधिक ६.३९ हेक्टर आहे.

(२) नागपूर जिल्हयात खरिप पिकांखालील क्षेत्र अधिक आहे.

(३) नागपूर जिल्हयात रब्बी पिकाचे क्षेत्र अत्यंत कमी आहे.

(४) नागपूर जिल्हयात सोयाबीन पिक प्रमुख आहे.

संदर्भ ग्रंथ

1. www.nagpur.nic.in
2. www.krishimaharashtra.gov.in
3. मनर, डॉ., जयकुमार, (१९९४) : 'आर्थिक भूगोल', विद्या प्रकाशन, नागपूर.
4. आगलावे, डॉ., प्रदीप, (२०००) : 'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर.
5. घारपूरे, डॉ., विठ्ठल, (२००४) : 'कृषी भूगोल', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
6. लांजेवार, डॉ., हरीश, डॉ., नागतोडे, (२००९) : 'नकाशा शास्त्र व प्रात्यक्षीक भूगोलशास्त्र', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
7. डॉ., नागतोडे, डॉ., लांजेवार, (२००९) : 'नकाशाशास्त्र व प्रात्यक्षीक भूगोलशास्त्र', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
8. पाटील, डॉ., आनंद, (२०११) : 'महाराष्ट्राचा भूगोल', स्टडी सर्कल प्रकाशन, पूणे.
9. खत्री, हरीशकुमार, (२०१२) : 'कृषी भूगोल', कैलाश पूस्तक सदन, भोपाल.
10. नागपूर जिल्हा कृषी योजना अहवाल -२०१७
11. घारपूरे, डॉ., विठ्ठल, (२०१७) : 'मानवी भूगोल', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
12. घारपूरे, डॉ., विठ्ठल, (२०१८) : 'महाराष्ट्राचा भूगोल', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
13. डीस्ट्रीक्ट गॅझेटीअर बूक.
14. घारपूरे, डॉ., विठ्ठल, (२०१८) : 'भारत भौगोलीक परिचय', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

नवदोत्तरी स्त्रीवादी कादंबरी

प्रा. रूपाली कांबळे
मुंबई.

१९९० मध्ये भारतात खुले आर्थिक धोरण लागू करण्यात आले. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. मुक्त अर्थव्यवस्थेला उभी करणारी ही प्रक्रिया आरंभ झाल्याने देशात बहुराष्ट्रीय कंपन्या केंद्रस्थानी आल्या. आर्थिक सुधारणांसोबत मनोरंजनाची नवी माध्यमे, इंटरनेट यामुळे जागतिक संस्कृती आली.

नव्या संस्कृतीच्या आगमनाने येथील सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक मूल्यांमध्ये बदल दिसू लागले. या सर्व बदलांचा भारतीय समाजजीवनावर प्रभाव दिसत आहे. स्त्री जीवनावरही या बदलांचे परिणाम दिसतात. स्त्रियांच्या पेहरावात व राहणीमानात बदल दिसू लागले आहेत, तिला शिक्षण व रोजगार करण्याची संधी मिळाली. माणूस म्हणून स्वत:ची ओळख सिध्द करण्यास पो ाक वातावरण मिळाले. नोकरीच्या निमित्ताने तिचा व्यवस्थेतील वावर वाढला. स्त्रीच्या व्यवसाय व रोजगार करण्यामुळे रा ट्र आणि कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेत बदल झाला. परंतु दोन्ही ठिकाणी निर्णय निर्धारण क्षमतेतील तिचा सहभाग नगण्यच आहे. ाहरात सेवाक्षेत्रांतील कामे स्त्रियांना पैसा मिळवून देणारी असली तरी याच क्षेत्रात त्यांच्यावर लैंगिक अत्याचार, बलात्कार झाल्याच्या घटना घडल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाने स्त्रीला विकासाचे मॉडेल म्हणून पुढे आणले. परंतु तिच्या विकासचे प्रश्न व्यवस्था समजून घेत नाही. तिच्या ारीर प्रदर्शनाशी संबंधित सर्व घटकांना बाजाराभिमुख व्यवस्था प्रेरणा देते. तिच्या क्षमता व बौध्दिक कुवतीकडे लक्ष न देता तिच्या सुंदरतेचे प्रदर्शन घडवून स्वत:चा टी आर.पी. व उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जातो. एकंदरीत जागतिकीकरणामुळे स्त्रीचे वैवाहिक व कौटुंबिक जीवन राजकीय जीवन, सामाजिक वेगाने बदलत आहे. स्त्रिच्या या बदललेल्या जीवनाचे चित्रण नव्वदोत्तरी मराठी साहित्यातही दिसून येते.

नव्वदोत्तरी स्त्रीवादी कांदबरीत स्त्रीच्या बदललेल्या जीवनाचे चित्रण अधिक प्रमाणात दिसते. स्त्रियांचे अनुभवविश्व अधिक व्यापक झालेले आहे. त्यामुळे परंपरा–रूढीतील चौकट मोडण्याची प्रक्रिया स्त्रियांच्या लेखनात दिसून येऊ लागली. गौरी देशपांडे, सानिया, शांता गोखले, आशा बगे, मेघना पेठे इ. लेखिका रूढ संकेतापासून मुक्त होऊन आधुनिक स्त्रीचे जीवन अधिक धीटपणे मांडताना दिसतात. आशा बगे यांची 'सेतू' ही अशीच स्त्रीवादी कादंबरी आहे. या कादंबरीची नायिका सूचिता हिला स्वत:चे दु:ख, वेदना स्वत:च निस्तरायची सवय आहे. कुटुंबचौकटीत अन्याय आणि रूढी परंपरेत अडकणारी ती नाही आहे.

आशा बगे यांच्या **'सेतू'** (१९९९) कादंबरीतील नायिका सुचिता ती 'करिअरिझम' च्या विळख्यात अडकलेली स्त्री दिसते. ध्येयवादी, करिअरिस्ट अशी बुध्दिमान संशोधक सुचिता उच्चशिक्षणासाठी अमेरिकेत जाते, संशोधनात रमते. परंतु तिची करिअर, नोकरी, कुटुंब सांभाळताना होणारी ओढाताण आणि तिचे ताणतणाव यावरून नव्वदोत्तर काळातील ती प्रतिनिधिक स्त्री असल्याचे दिसते.

सुशिक्षित होऊन आपल्या आर्थिक स्वावलंबनाच्या पायऱ्या चढणाऱ्या स्त्रियांची पहिली पिढी समाजात धडपडतानाचा अवकाश शांता गोखले यांची **'रीटा वेलिणकर'** (१९९०) ही कादंबरी शब्दबध्द करते. पारंपारिक समाज आणि त्याने निर्माण केलेल्या चौकटीत राहून 'स्व' ची जाणीव झालेली नवी स्त्री यांचे अगदी प्रत्ययकारक चित्र शांता गोखले यांनी रेखाटले आहे. 'रिटा वेलिणकर' या कादंबरीत रीटाच्या संदर्भातून तिचे कुटुंब, सोसायटी, शाळा – ऑफिस, नोकरी, साहेब व इतर कर्मचारी यांच्या तपशिलांच्या चित्रणातून भारतीय स्त्रीच्या समाजनिर्मित शोषण व्यवस्थांवर अचूक प्रकाश पडतो.

स्त्री–पुरूष संबंधातील ताणतणाव **'रिटा वेलिणकर'** या कादंबरीत चित्रित केले आहेत. तर बदलती जीवनमूल्ये आणि त्यामुळे कलेपासून पत्रकारितेपर्यंत प्रत्येक क्षेत्रात निर्माण झालेल्या विद्वेषी स्पर्धेचे चित्रण शांता गोखलेंच्या **'त्या वर्षी'** (२००८) या कादंबरीत होते.

जोत्स्ना देवधर यांची **'घरगंगेच्या काठी'** ही कादंबरी स्त्रीवादी दृष्टीकोनातून लिहिलेली आढळते. एकत्रकुटुंब पध्दतीतील ताण–तणाव, सुखदु:ख, संवाद, विसंवाद इ. गोष्टी साकार झाल्या आहेत. पूर्वी एकत्र कुटुंबातील सासुरवाशीन मुक्याने जगणारी होती. जोत्स्ना देवधरांच्या कादंबरीतील स्त्रीने हे वर्चस्व झुगारण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक स्त्रीची होणारी ओढाताण, अनेक भुमिका बजावताना तिच्यावर येणारा ताण, सर्व नाती सांभाळताना होणारी फरपट समर्थपणे साकारली आहे. सानिया यांच्या कादंबऱ्यांमध्येही असे चित्रण पाहावयास मिळते.

सानिया यांच्या आवर्तन, स्थलांतर या कादंबऱ्या नवे विषय घेऊन कुटुंबातील नातेसंबंधांचे चित्रण करतात. आधुनिक स्त्रियांच्या संवेदनशीलता आणि प्रस्थापित समाजमूल्यांचा संघर्ष सानिया यांनी **स्थलांतरे (१९९४), आवर्तन (१९९६), अवकाश (२००१)** या कादंबऱ्यांमधून मांडला आहे. बुध्दिनिष्ठ आणि कणखर वृत्तीची समर्थ स्त्री सानियांच्या कादंबरीतून चित्रित झालेली दिसून येते. स्त्रीच्या ताकदीचा, तिच्यातील सुप्त क्षमता यांचा वेध त्यांच्या कादंबऱ्यांतून घेतला जाताना दिसतो.

नव्वदोत्तर काळातील बदल प्रथम दिसतात ते आर्थिक क्षेत्रात. स्त्रियांचे जीवन त्यामुळे विविध स्तरांवर प्रभावित झाले. चंगळवादाने स्त्रियांना आकर्षित केले याचे चित्रण अनेक कादंबऱ्यातून स्पष्ट होते.

श्याम मनोहर यांच्या **'खूप लोक आहेत' (२००२)** या कादंबरीतील 'अंजू' ही शहरातील घरकाम करणारी तरूणी महाग कपडे, सौंदर्य प्रसाधने, पादत्राणे याबाबतचे आकर्षण व्यक्त करते. तर आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याने अनेक प्रश्न हाताळणारी परदेशी एजन्सीत काम करणारी 'नमिता' मिलिंद बोकील यांनी 'रण' या कादंबरीतून चित्रित केली आहे.

महानगरातील स्त्रियांचे बदलते आर्थिक जीवन व त्याचे विविध पैलू कविता महाजन यांच्या **'भिन्न' (२०१०)** या कादंबरीत पाहायला मिळतात. 'भिन्न' या कादंबरीतून एड्स सारख्या रोगामुळे महानगरीय स्त्रियांच्या आयुष्यात निर्माण झालेल्या प्रश्नांची चर्चा आहे. या निमित्ताने आधुनिक समाजाचे भयानक रूप कविता महाजन चित्रित करतात.

विश्राम गुप्ते यांच्या **'नारी डॉट कॉम' (२०१०)** या कादंबरीतील सुशिक्षित तरूणी पॉकेटमनीकरीता कॉलगर्ल म्हणून काम करते. नव्वदोत्तर काळातील स्त्रियांवर पैशाची निकड म्हणून कुटुंबाकरिता वेश्याव्यवसाय पत्करण्याची वेळ आल्याचे दिसते तर काही कादंबऱ्यांमध्ये चंगळवादाच्या आहारी जाऊन जुनी मूल्ये विसरत विचारहीन, दिशाहीन होणाऱ्या स्त्रियांचे चित्रण येते.

नवदोत्तर काळातील वेगवान प्रसारमाध्यमांमुळे शहरी चंगळवादाचे थेट दर्शन ग्रामीण कुटुंबावर व नातेसंबंधावर होत असल्याचे चित्रण कृष्णांत खोत, अशोक कोळी, सदानंद देशमुख यासारखे अनेक कादंबरीकार करतात.

सदानंद देखमुख यांच्या 'तहान' या कादंबरीत त्यातील रत्ना हे पात्र कपडे, सिनेमा, थम्सअप यासारख्या गोष्टींकरिता स्वत:चे शरीर देते. प्रेम, लग्न या बाबींचा विचारही येथे येत नाही. प्रगत तंत्रज्ञानामुळे आज नव्या गोष्टी शहरे व खेडी यात एकाच वेळी पोहचत आहे.

१९९२ साली स्थानिक स्वराज्य संस्थात महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या व २०११ मध्ये महिलांसाठी ५० टक्के जागा आरक्षित केल्या. याचा लाभ घेत महिला लोकप्रतिनिधी हिमतीने राजकीय कामात पुढाकार घेत आहेत. या राजकीय जीवनाचे चित्रण कविता महाजन यांनी **'राहूकेतु'** व **'ब्र'** या कादंबऱ्यांतून केले आहे. पितृसत्ताक व्यवस्थेत सत्तास्थानी काम करताना स्त्रियांना येणारे सकारात्मक व नकारात्मक अनुभवांचे वास्तव कादंबरीतून पुढे येते.

'भिन्न' कादंबरीबाबत नीलिमा गुंडी लिहितात, ''या कादंबरीच्या निमित्ताने आर्थिक उदारीकरणामुळे बदललेला जीवनस्तर, खाजगीकरणातून आलेले चंगळवादी तत्वज्ञान, शरीरनिष्ठा, सुखाची अनिर्बंध तहान आणि जागतिकीकरणामुळे परदेशी बाजारव्यवस्थेचे होणारे आक्रमण अशा सामाजिक घटकाचे चित्रण येते''.

शिक्षण, नोकरी, नोकरीतून मिळणारा आत्मविश्वास यामुळे नव्या स्त्रीचे विश्व बदलले आहे. स्व आणि स्व–संबंध्द नात्याकडे ती आता नव्या दृष्टीने पाहताना दिसते. तिचे रूप अंतर्बाहय बदलले आहे.

मेघना पेठे यांनी **'नातिचरामि' (२००५)** या कादंबरीतून माणूस म्हणून जगू पाहणाऱ्या आधुनिक स्त्रीची अवहेलना चित्रित केली आहे. घटस्फोटामुळे निर्माण झालेले प्रश्न या कादंबरीत चर्चिले आहेत. मानवी संबंधाची गुंतागुत या कादंबरीत चित्रित झाली आहे.

अशीच गुंतागुंत अंबिका सरकार यांच्या **'एका श्वासाचे अंतर' (१९९०)** व **'अंत ना आरंभही' (२००८)** या कादंबऱ्यांतून पहावयास मिळते. कौटुंबिक आणि एकूणच मानवी नातेसंबंध हाताळत असताना तिच्या व्यक्तिमत्वाचा कसा कस लागतो याचे दर्शन अंबिका सरकार यांच्या कादंबऱ्यातून होते.

गौरी देशपांडे यांनी माणूस म्हणून जगत असताना उच्चमध्यमवर्गीय स्त्रियांना कराव्या लागणाऱ्या संघर्षाची मांडणी आपल्या लघुकादंबऱ्यांमधून केली. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून समाज व्यवस्थेमुळे स्त्रियांच्या भावनिक विश्वावर होणारे आघात चित्रित केले. त्यांच्या नायिका अतिशय समर्थपणे या सर्व परिस्थितीला सामोऱ्या जातात.

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीमधून आधुनिक स्त्री आणि तिचे मन या गोष्टी दिसून येतात. त्यांच्या कादंबरीतील स्त्री विविध क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने काम करणारी, आर्थिक स्वातंत्र्य उपभोगणारी आहे. विवाहित असो वा नसो हयाचे तिला विशेष काही वाटत नाही. तिने स्वत:ला एक व्यक्ती मानलेले आहे व इतरांनीही तसेच मानले पाहिजे हा तिचा आग्रह

आहे. अशी स्वतंत्र, मुक्त स्त्री गौरी देशपांडे आपल्या कादंबरीतून चित्रित केली आहे.

अशाप्रकारे नव्वदोत्तरी स्त्रीवादी कादंबरीतून आशा बने, गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, कविता महाजन, जोत्स्ना देवधर, सदानंद देशमुख, मिलिंद बोकील यासारख्या कादंबरीकारांनी स्त्रियांच्या प्रश्नांची वैविध्यपूर्ण मांडणी आपल्या कादंबऱ्यांमधून केली. व्यवस्थेच्या विरोधात जाण्याची ताकद या काळात स्त्रियांमध्ये उत्पन्न झालेली आहे. त्यामुळे या काळातील लेखिकांनी कुटुंबव्यवस्थेला पर्याय शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्त्रियांच्या चळवळीतून आलेल्या, स्त्री–पुरूष समानतेच्या विचाराचा पाठपुरावा करणाऱ्या सुशिक्षित होऊन आर्थिक स्वावलंबनाच्या पायऱ्या चढणाऱ्या स्त्रिया नव्वदोत्तरी स्त्रीवादी कादंबरीतून दिसून येतात.

संदर्भ ग्रंथ :–

१. नव्वदोत्तर मराठी साहित्य: सत्यवान मेश्राम. संपादक मंडळ – डॉ. अजय कुळकर्णी, डॉ. राजेंद्र नाईकवाडे,डॉ. कृष्णा साकुळकर, डॉ. दत्तात्रय वाटमोडे.
२. स्त्रीलिखित कादंबरी : नीलिमा गुंडी, संपादन अरूणा ढेरे.
३.स्त्रीलिखित कादंबरी : रेखा इनामदार साने, संपादन– अरूणा ढेरे
४. मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड सातवा : १९५० ते २०००, महाराष्ट्र साहित्य परिषद
५. मराठी कादंबरीतील स्त्रीवाद : डॉ. वंदना महाजन